म. ग्रं. सं. ठाणे २६८

सन १८८३

विषय किरकोळ

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव पुण्याचे चहा बिस्कीट प्रकर्ण

२७५

ग्रंथ

१८८३

श्रीशंकर

(केवळ चतुःशाखीय षट्कर्माधिकारी महाराष्ट्र ब्राह्मणांच्याच स्वतःचे उपयोगाकरितां.)

# पुण्याचें चहाबिस्किट प्रकर्ण!!

या कामीं श्रीमच्छंकराचार्य मठकरवीर व संकेश्वर यांनीं नेमलेल्या अधिकाऱ्यांकडून झालेल्या संशयी ठराव व शुद्धिपत्राचा पुनः विचार होऊन ठराव करण्याकरितां श्रींनीं नेमलेल्या तिऱ्हाईत त्रिवर्ग पंचांचे, प्रायश्चित्तीय (मुख्य व संसर्गी) लोकांबद्दल अभिप्राय, व सदर्हू प्रकरणांसंबंधीं श्री जगद्गुरु, श्री० पंतसाहेब प्रतिनिधि, व भडकमकर न्यायाधीश वगैरे मध्यें झालेल्या पत्रव्यवहारांपैकीं कांहीं मुद्याचे लेख आणि या प्रकरणीं देशोदेशींच्या विद्वानांचे आलेले धर्मशास्त्रसंबंधीं अभिप्रायांसह.

हें पुस्तक

**बळवंत रामचंद्र नातु**

यानीं

सत्यस्फोटनार्थ स्वधर्माभिमानी चतुःशाखीय ब्रह्मवृंदाकरतां.

पुणें "जगद्धितेच्छु" छापखान्यांत छा.

मि० पौष शुद्ध १ शके १८१६

रा. रा. नानासाहेब वैद्य यांस भेट.

# श्री.

## वे० शा० सं० रा० रा० चतुःशाखीय षट्कर्माधिकारी ब्रह्मवृंद पुणें, स्वामीचे सेवेसीं.

सा. न. वि. वि. पुणें येथील चहा बिस्किट ग्रामण्यासंबंधानें पुण्यांत, कुरुंदवाड मुक्कामीं व श्रीकडे काम चाललें होतें त्यासंबंधानें पुण्याची व कुरुंदवाडची वगैरे हकीकत थोडीबहुत प्रत्येकास कळली आहेच. कारण, त्यासंबंधानें बहुतेक पुण्यांतील व इतर ठिकाणच्याही वर्तमानपत्रांतून दोन्ही बाजूंचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. तथापि, साधार अशी हकीकत प्रसिद्ध झालेली नाहीं व ती सर्व प्रसिद्ध करण्याची हल्लीं अवश्यकताही राहिली नाहीं. परंतु ह्या ग्रामण्याचा अखेर निकाल बार अंक ५५ मि. आश्विन शु. ५ शके १८१४ चें आज्ञापत्र मला श्रींनीं दिलें त्याप्रमाणें होण्याचा आहे. कुरुंदवाड मुक्कामीं त्रिवर्ग न्यायाधीशांपुढें बेचाळीस व तत्संसर्गी यांबद्दल काम चाललें व त्यांबद्दलचे त्रिवर्ग न्यायाधीशांचे अभिप्राय श्रीकडे वैशाख शके १८१५ तच गेले. तरी बार अंक ५५ शके १८१४ च्या आज्ञापत्राप्रमाणें अद्यापपावेतों निकाल न मिळाल्यामुळें हें भिजत पडलेलें घोंगडें ब्रह्मवृंदांपुढें साधार ठेवणें भाग झालें आहे.

या कामीं वैशाख वद्य १ शके १८१४ चा अधिकाऱ्यांचा ठराव व त्यानंतर वे. शा. सं. बिंदुमाधव शास्त्री यांनीं दिलेलें शुद्धिपत्र येथपर्यंतची हकीकत प्रसिद्ध झाली आहेच. त्या दोहोंबद्दल वादीपक्षाची तक्रार असून त्यावरच बार अंक ५५ प्रमाणें कुरुंदवाड मुक्कामीं अपिलाचें काम चालू असून त्यांत संसर्गीयांबद्दलही एक तक्रार होती. या तिन्हींबद्दल न्यायाधीश यांनीं दिलेले अभिप्राय प्रसिद्ध करून सर्वांचें ऐक्य असल्यास तसे रीतीचा ठराव आणि त्रिवर्गांचें ऐक्य नसल्यास बहुमताचा ठराव कारभारी यांनीं प्रसिद्ध करणें येवढेंच काम राहिलें असतां तें अद्याप पावेतों न झाल्यामुळें जी जी माहिती लेखी व तोंडी मिळाली ती मी आपल्यापुढें ठेवितों.

सदरहू ग्रामण्याचा संबंध ब्राह्मणज्ञातींतच असल्यामुळें फक्त त्या ज्ञातींतील लोकांकरतांच हें पुस्तक छापलें आहे.

पुणें येथें श्रीचे मार्फत आलेल्या दोन अधिकाऱ्यांनीं केलेल्या ठरावावर व शुद्धिपत्रावर वगैरे अपील श्रीकडे करण्यास सुबोधपत्रिकेंत प्रसिद्ध झालेलें बेचाळिसांतील एक या सहीचें पत्र व बॉंबेग्यॉझेटमध्यें ता० २६ मे १८९२ इसवीचें रा. ब. म. गो. रानडे यांचें प्रसिद्ध झालेलें पत्र वगैरेवरून हरकत आहे असें मीं श्रीस लेखी व तोंडी कळविल्यावरून श्रीसही ती हरकत योग्य वाटल्यामुळें त्यांनीं बार अंक ५५ मि. आश्विन

शु. ९ शके १८१४ चें आज्ञापत्र देऊन कळविलें कीं:—

"**तुह्मीं आश्विन शु० द्वितीयेचें विनंतिपत्र लिहिल्याप्रमाणें विचार करण्यास तिऱ्हाईत न्यायाधीश संस्थानाकडून नेमून व संस्थानचे कारभारीमार्फत तुह्मास यथान्याय निकाल मिळेल.**" आश्विन शु० २ शके १८१४ या मितीस अपील श्रीकडे चालविण्यास हरकत असल्याबद्दलचें श्रीस सादर केलेलें विनंतिपत्र निशाण (१) व या पत्राचें उत्तर श्रीकडून आलेलें आज्ञापत्र बार अंक ९९ शके १८१४ निशाण (२) हीं खालीं दिलीं आहेत. त्यावरून **तिऱ्हाईत न्यायाधीशांचा निकाल कारभारी यांचे मार्फतच मिळावयाचा आहे,** असें दिसून येईल.

निशाण (१)

श्रीः

"श्रीमज्जगद्गुरु मठ संकेश्वर व करवीर यांचे चरणसेवसी–विद्यार्थी बळवंत रामचंद्र नातु कृतानेक शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत आश्विन शुद्ध २ शके १८१४ पावेतों मुक्काम खिद्रापूर येथें श्रीचरणीं हजर असो विशेष. श्रीकडून भाद्रपद वद्य १० शके १८१४ वार अंक ९० चें आज्ञापत्र आलें त्याजबद्दल उत्तर पुण्याहून विनंतिपत्र रजिस्टर करून पाठविलें त्यांत बहुतेक सर्व खुलासा केला आहे. तत्रापि "तुह्मीं आपल्या काय तक्रारी असतील त्या आठ दिवसांत विदित कराव्यात. तुह्मीं कोणतीही सबब न लिहितां वर लिहिलेले मुदतींत तुमचेकडून तक्रारी अर्ज आल्यास त्याचा विचार करण्यांत येईल" अशी आज्ञा सक्तीची त्या आज्ञापत्रांत आल्यामुळें हजर होऊन अपील दाखल करण्याच्या तक्रारीही श्रीचरणीं मिति आश्विन शुद्ध १ गुरुवारीं सर्व कळविल्या, त्याबद्दल श्रीकडून आह्मांस निकाल आज मिळावा अशी विनंति आहे.

१ रावबहादुर रानडे व भट यांचीं पत्रें आणि सुबोधपत्रिकेंतील प्रसिद्ध झालेलें बेचाळिसांतील एकाचें पत्र व ज्ञानदीप पुस्तकाचा अंक यासंबंधानें **ज्या टीका श्रीवर त्या त्या लेखकांनीं केल्या त्यांबद्दल आह्मास प्रथम निकालजबाब मिळाला पाहिजे, ह्मणजे ठरावावर अपील करण्याबद्दल ज्या तजवीजी करणें त्या करण्यास ठीक पडेल.**

१ सदर तिन्ही लेखांतील मजकुराबद्दल खुलासा श्रीसंनिध करतांना श्रीची प्रत्यक्ष आज्ञा झाली कीं, रानडे, बेचाळिसांतील एक, आणि ज्ञानदीपांतील मजकुराचे संबंधानें श्रीची खात्री असल्यामुळें श्रीकडून रावबहादुर रानडे यांस पत्र पाठवून खुलासा मागविण्याची जरूर नाहीं असें वाटल्यावरून पत्र पाठविण्याचें रहित केलें अशी आज्ञा समक्ष झाली आहे, सबब, वर मागितलेला निकाल मिळण्यासही कोणतीच हरकत नाहीं. व तो निकाल मिळावा ह्मणून मागणें करण्याकरितां व तो निकाल घेण्याकरितां येथें आलों आहे तरी आज निकाल मिळावा अशी आगत्यपूर्वक श्रीचरणीं विनंति आहे.

१ त्याचप्रमाणें अपिलाचें काम कशा रीतीनें व कोणते विद्वान् आणून चालणार त्याचे नियम जे करण्यांत येतील त्यांचीही नकल देण्यांत यावी.

सदरीं लिहिलेवरून निवेदनांत येईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

बळवंत रामचंद्र नातु,

निशाण ( २ )
श्रीशंकर.
शिक्का.

( स्वस्तिश्री पासून तो नारायण स्मरणानि पर्यंत संस्कृत मायना. )

" श्रीमत्सकल गुणालंकरण श्री गुरुभक्तिपरायण मठाभिमानी धुरंधर श्रिया विराजित राजश्री बळवंतराव रामचंद्र नातु वस्ती शहर पुणें आज मुक्काम खिद्रापूर परम शिष्योत्तम यांसी विशेषस्तु. तुमचें कल्याण इच्छित छात्रसभा समवेत श्रीनिकट असो. अत्रत्य कुशल जाणून स्वकीय लेखनीं मानस संतोषवीत असलें पाहिजे. तदनंतर तुह्मांस संस्थानांतून आज्ञापत्र बार अंक ५० मित्ति भाद्रपद वद्य १० शके १८१४ चें गेल्याप्रमाणें तुह्मी स्वारी मुक्कामीं आला, परंतु श्रीनवरात्राचा उत्साह व त्या कारणानें संस्थानचे कारभारी राजमान्य राजश्री माधवराव मोरेश्वर भडकमकर यांसी येथें येण्यास नड असल्यावरून तूर्त चौकशीचें काम तहकूब ठेविलें आहे. **वर्तमान पत्रांतील लेखांवरून ठराव व प्रायश्चित्ताचा वगैरे संशय दिसत आहे. तुह्मीं आश्विन शुद्ध द्वितीयेचें विनंतिपत्र लिहिल्याप्रमाणें विचार करण्यास तिऱ्हाईत न्यायाधीश संस्थानाकडून नेमून व संस्थानचे कारभारीमार्फत तुह्मास यथान्याय निकाल मिळेल.** चौकशीची मित्ति नेमून तुह्मांस कळविण्यांत येईल त्याप्रमाणें येण्याचें करावें. तुह्मी संस्थानचे पूर्ण साभिमानी अगत्यवादी आहांत तेथें विस्तारें लिहावें असें नाहीं. विशेष लिहिणें तें काय. मित्ति आश्विन शुद्ध ९ शके १८१४ नंदननाम संवत्सरे मुक्काम खिद्रापूर पेटा शिरोळ इलाखा करवीर महानुशासनं वरिवर्ति. बार अंक ९९ (इत्यलम्)

सदरीं नमूद केलेल्या ह्या ( २ ) निशाणींवरून अखेरचा निकाल संस्थानचे कारभारी रा. रा. माधवरावजी भडकमकर यांजकडूनच त्रिवर्ग न्यायाधीश यांच्या ठरावांतील बहुमताप्रमाणें पक्षकारांस मिळण्याचा आहे. करितां त्रिवर्ग न्यायाधीशांच्या अभिप्रायांतील बहुमताप्रमाणें सदर कारभारी साहेब यांजकडून निकाल न मिळतां **अन्य रीतीनें मिळेल तर तो मान्य करण्याचा नाहीं असें श्रीचे बार अंक ५९ च्या वरील आज्ञापत्रावरून स्पष्ट होत आहे.**

श्रीकडून श्रीमंत राजश्री बापुसाहेब कुरुंदवाडकर यांस बार अंक ८३ शके १८१४ चें आज्ञापत्र पाठविण्यांत आलें. त्यांत लिहिलें आहे कीं " शहर पुणें येथील ग्रामण्यसंबंधीं चौकशीस नेमलेले अधिकारी यांनीं केलेले निकालावर तक्रारी आल्यावरून **तुह्मी व इकडील संस्थानचे कारभारी रा. रा. माधवराव मोरेश्वर भडकमकर यांनीं कागदपत्र पाहून विचार करावा,** असें वाटल्यावरून पूर्वी तुह्मास सुचविलें आहे त्याप्रमाणें आतां तुह्मी कागदपत्र आदिकरून चौकशीनें या कामीं तुमचा अभिप्राय कळविण्यांत यावा. " त्याप्रमाणें कुरुंदवाड मुक्कामीं त्रिवर्ग न्यायाधीश श्रीमंत राजश्री बापुसाहेब व बाळासाहेब कुरुंदवाडकर व रावसाहेब माधवराव मोरेश्वर भडकमकर यांचे समोर गेल्या मार्गशीर्ष अखेरीस काम सुरू झालें. बार अंक ८३ चे आज्ञापत्रांतील सदरील मजकूर अवलोकन केला ह्मणजे आपली सर्वांची खात्री होईल कीं, रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनी **भडकमकर यांस न्यायाधीश नेमूं नये अशी जी हरकत श्रीपुढें केली होती**

ती श्रीनीं अमान्य केली आहे.

आतां त्रिवर्ग न्यायाधीश यांचे अभिप्राय मजला खिद्रापूर मुक्कामीं श्रीकडून पहाण्यास मिळाले व ज्या कांहीं नकला मिळाल्या त्यांवरून बहुमत ह्मणजे श्रीमंत बापुसाहेब कुरुंदवाडकर व रावसाहेब माधवराव मोरेश्वर भडकमकर यांचे अभिप्राय वादीपक्षाला अनुकूल असून त्यांजकडून प्रतिवादी व तत्संसर्गी यांस प्रायश्चित्तें दिलीं पाहिजेत वगैरे खुलासा त्यांनीं आपआपल्या अभिप्रायांत केला आहे. करितां या खालीं श्रीमंत बापुसाहेब यांचा अभिप्राय (निशाणी ३) या खालीं दिला आहेच.

निशाण ३

## श्रीमंत बापुसाहेब कुरुंदवाडकर यांचा अभिप्राय.

" मित्ति चैत्र वद्य १ शके १८१५.

पुणें मुक्कामीं कांहीं साहेबांनीं तयार केलेला चहा व बिस्किटें खाल्लच्या प्रकरणीं ग्रामण्य होऊन या ग्रामण्य संबंधी श्रीचे अधिकारी यांनीं पुणें मुक्कामीं मित्ति वैशाख वद्य १ शके १८१४ रोजीं निकाल केला तो निकाल धर्मशास्त्राप्रमाणें झाला नाहीं. व इतर गोष्टींचाही विचार केला नाहीं याकरितां त्या प्रकरणाचे कागदपत्र पुनः श्रीनीं पाहून योग्य निकाल करावा ह्मणून श्रीकडे नातु वगैरे मंडळींनीं विनंति केली **त्याजवर संस्थानचे कारभारी व दुसरे पंच नेमून विचार होईल अशी श्रीची आज्ञा झाली** व इकडेही सूचना आली. त्याजवर नातु वगैरे मंडळींनीं कार्तिक व० १२ शके १८१४ रोजीं जो अर्ज श्रीचे कारभारी यांजकडे गुदरला तो प्रतिपक्षकार यांनीं त्याचीं उत्तरें ह्मणून दिलेल्या अर्जासह ग्रामण्याचे कागदपत्र पाहून अभिप्राय देण्याविषयीं श्रीकडून आज्ञापत्र आल्यावरून हें काम आमचेकडे आलें आहे. या कज्जाची हकीकत समजाविण्याकरितां उभय पक्षकारांस श्रीचे कारभारी यांजकडून कळविण्यांत आल्यावरून उभयपक्षकारतर्फे मुकत्यार व कांहीं खुद्द मंडळी अशी हजर झाली. वादी नातु वगैरेंची अशी तक्रार आहे कीं, प्रतिवादींपैकीं कांहीं मंडळींस नोटिसा केल्या नाहींत व पूर्वी जे बहिष्कृत असल्याचें सांगितलें असतां त्यांचा निकाल हल्लींच्या ठरावांत केला आहे. २ महादेव गोविंद रानडे वगैरे लोकांचा अर्ज चौकशी पुरी झाल्यावर वादीस हजर न ठेवितां घेऊन त्यांच्या संबंधानें ठरावांत निकाल केला हें बरोबर नाहीं. ३ बाळ गंगाधर टिळक यांनी काशीस जाऊन प्रायश्चित्त घेतल्याचा अर्ज परोक्ष घेऊन निकाल केला आहे. ४ गो० ब० देवल प्रभृती मंडळींनीं चहा घेतला नाहीं व बिस्किटें सेवन केलीं नाहींत ह्मणून ठरविलें ती चूक आहे. ५ प्रतिवादींनीं हें धर्मबाह्य कृत्य मिशनगृहांत जाऊन केलें नाहीं हें ह्मणणें अन्यायाचें आहे. ६ हेतुपुरःसर केलेले कर्माबद्दल पश्चात्ताप नसतां प्रायश्चित्त देण्याचा ठराव केला ही चूक आहे, करितां सांसर्गिक लोकांसही प्रायश्चित्त असणे योग्य आहे. ७ अधिकारी यांचा ठराव शास्त्रविरुद्ध व रूढीविरुद्ध व लोकमताविरुद्ध अन्यायाचा व पक्षपाताचा आहे. ह्मणून वगैरे तेरा कलमी अर्ज दाखल केला आहे.

याजवर प्रतिवादींनीं उत्तरें अर्जानें दिलीं तीं.

१ नोटिसा कोणास कराव्या यांचा संबंध वादीकडे नाहीं ही तक्रार नोटीस न देतां ज्यांच्या विरुद्ध निकाल झाला असेल त्यांनीं करावयाची आहे. २ रानडे वगैरे यांच्या अर्जाबद्दल जो मजकूर लिहिला तो चुकीचा आहे. वादीचा अभियोग शाबीत न झाल्यामुळें काढून टाकून विज्ञप्तिनाल्यानें अन्य त-

ऱ्हेनें चौकशी करून निकाल केला आहे व याजबद्दलचा समग्र अधिकार श्रींचे अधिकारी यांजकडे होता. असें कागदपत्रावरून दिसेल. ३ टिळक यांनीं प्रायश्चित्ताबद्दल पूर्वी कळविण्याचा प्रसंग नव्हता. दोषी आहेत असें ठरल्यावर प्राप्ति येते व तशी आल्यावर कळविलें आहे. कलम दोन यांतील तक्रार यांस लागू आहे. ४ वादीच्या अर्जांतील कलम चार पांच संबंधानें पुराव्याचे प्रश्न आहेत, तेव्हां कोणी विचार केला असतां अधिकारी यांचे निर्णयाप्रमाणेंच निकाल करावा लागेल. ५ प्रतिवादींनीं बुद्धिपुरःसर हें कृत्य केल्याबद्दल यत्किंचितूही शाबीद होत नाहीं, तरी वादी आपला आग्रह सोडीत नाहींत. अधिकारी यांचा ठराव असावा त्यापेक्षां कडक आहे ज्यांजवर दोष नाहीं त्यांस प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. व दोषास जीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत त्यांहून कडक आहेत. ६ कलम १२।१३ यांतील तक्रारी व्यापक व संदिग्ध आहेत. खुलासा केल्यावर मागाहून कळवूं. ७ हल्लींचा अर्ज श्रींचे कारभारी व श्रीमंत रा० बापुसाहेब कुरुंदवाडकर यांस उद्देशून लिहिला आहे. कुरुंदवाडकर यांची पंचनात्यानें नेमणूक जाहल्याचें श्रींकडून आज्ञापत्र निघालें नाहीं. नंबर ९९ चे आज्ञापत्रांत तिऱ्हाईत पंच नेमून कारभारीमार्फत निकाल कळविण्यांत येईल अशी आज्ञा होती. ८ चार पांच तिऱ्हाईत पंच नेमून त्यांपुढें काम चालविण्यास व जाब देण्यास वादी कबूल असल्यास तारीख नेमण्यांत येईल त्या दिवशीं आह्मी हजर राहूं ह्मणून वगैरे.

उभय पक्षकार हजर जाहले तेव्हां प्रतिपक्षकारतर्फे टिळक व नगरकर यांणीं प्रथम दर्शनीं अशी तक्रार घेतली कीं, आमचे ह्मणण्याप्रमाणें चार पांच पंचांस निमंत्रणें गेलीं होतीं त्यांचीं नांवें.

१ श्रीमंत रा. बाबासाहेब इचलकरंजीकर. २ श्रीमंत बाबासाहेब विशाळगडकर. ३ रावबहादूर यशवंत वासुदेव आठले नायब दिवाण बडोदें. ४ रा. गोविंदराव लिमये वकील कोर्ट अष्टें. यांस निमंत्रणें जाहलीं असोन कोणी हजर नाहींत. फक्त श्रीमंत रा. बापुसाहेब व बाळासाहेब कुरुंदवाडकर हजर आहेत. तेव्हां सर्व पंचांचा समावेश एके ठिकाणीं होण्याची सवड नाहीं, तरी कुरुंदवाडकर यांणीं आमची तक्रार ऐकून घेऊन श्रीस अभिप्राय देण्यांत यावा. बाकीचे पंचांपुढें या तक्रारीसह कागदपत्र गेल्यास त्यांजला कागदपत्र पाहून अभिप्राय देतां यावा ह्मणून आह्मी तक्रार पुढें ठेवीत आहों, असें बोलून श्रींचे कारभारी हे या कामीं निवडलेले पंच आहेत असें समजूं नये, असें बोलून तक्रारी सांगण्यास सुरवात केली, त्या वेळीं श्रींचे कारभारी यांणीं असें सुचविलें कीं, सदर्हू लोकांस निमंत्रणें गेलीं होतीं त्यापैकीं श्रीमंत इचलकरंजीकर यांणीं पंच होण्याचें नाकबूल केलें आहे. व बाकीचे लोकांनीं या वेळेस येणें होत नाहीं असें कळविलें आहे. यामुळें कोणी हजर नाहींत-सर्व पंच एके जागीं जमण्यास किंवा प्रत्येकांचीं मतें घेण्यास दिनावधि होणार व त्यापासून लोकांची अतिशय गैर सोय होईल. करितां येवढ्याच पंचांचा अभिप्राय घ्यावा. अशी श्रींची आज्ञा आहे. असें कळविल्यावर तक्रारी ऐकण्यास सुरवात झाली.

या कज्यांत वादीचा अपील अर्ज आणि प्रतिवादींचा उत्तरांचा अर्ज वाचण्यांत येऊन त्यांतील कलमें ३।४।५।७।१०।११ या तक्रारींचा विचार होण्याचें ठरविलें. अपील अर्जांतील कलमें १।२।६।८।९।१२ हीं चौकशी-

च्या संबंधांत नोटिसा केल्या नाहींत, पुरावा घेतला नाहीं, अशी किरकोळ असल्यामुळें त्यांचा विचार करण्याची जरूर नाहीं.

**अर्जाचें कलम १३ हें या कज्याचें अखेर निकालांत दोषारोप ठरले लोकांच्या प्रायश्चित्त प्रकरणीं शास्त्रार्थाबद्दल असल्यानें तें शास्त्रार्थावर ठेविलें आहे. त्याचा निर्णय शास्त्रीय सभेकडून व्हावा असें ठरविलें.**

पुणें शहरांत कांहीं ब्राह्मण मंडळी धर्मविरुद्ध आचरण करितात त्याबद्दल विचार होण्यासाठीं त्याच शहरांतील कांहीं ब्रह्मवृंदांनी श्रीकडे अर्ज करून पुणें शहरांतीलच लोकांस अधिकार मिळविण्याबद्दल विनंति केली होती. पण या गोष्टीचा श्रींनीं सारासार विचार करून याचे चौकशीकरितां संस्थानांतील वे. शा. संपन्न रा० रा० बिंदुमाधव शास्त्री व व्यंकटशास्त्री निपाणकर यांची योजना केल्यावरून उभयतांनीं ठराव केला तो.

ठरावांत फिर्यादी पक्ष दोन दाखविले आहेत. एक अभियोग व दुसरा विज्ञप्ति. या दोन फिर्यादींचा निकाल करण्यांत अभियोग करणारे फिर्यादीकडून शाबिदी न झाल्यामुळें विज्ञप्ति व इतर गोष्टींचा विचार करून निकाल केला आहे त्याचा सारांश.

प्रथम फिर्यादींनीं ४६ लोकांवर चहा बिस्किटें हूणांचे हातचीं सेवन केलीं ह्मणून दोषारोप केला आहे.

३ ब्राह्मण खेरीज इतर लोक असलेले फिर्यादीनीं कमी केले तेः—

१ रा. भि. कुळकर्णी शेणवी. २ वि. ना. गुजर. ३ रा. बा. लेले. धर्मांतर केलेले.

४ मिशन गृहांत गेले नाहींत अशा समजुतीनें कमी झाले तेः—

१ ब. ग. मराठे. २ ना. र. देवस्थळे. ३ ह. ना. आपटे. ४ रा. भि. जोशी.

———

४

असे सात असामी वादींनीं निरनिराळे कारणांवरून कमी केले. बाकीं राहिलेले लोक ३९ यांजला प्रायश्चित्तें सांगितलीं तींः-

३ ब्रह्मवृंदाकडून निकाल झालेलेः—

१ ह. वि. आठवलें. २ गो. ह. पानशे. ३ वि. अ. पटवर्धन.

———

३

या तिघांनीं ब्रह्मवृंदाकडून प्रायश्चित्त घेतलें सबब प्रायश्चित्ताचें कारण नाहीं. बाकी राहिलेले ३६ यांजला ठराव करणारांनीं प्रायश्चित्तें सांगितलीं तीं,

८ चहा घेतला नाहीं असे सिद्ध झालेलेः—

१ प. ना. पाटणकर. २ स. रा. फडके. ३ र. ना. पंडित. ४ बा. रा. सोमण. ५ कृ. ब. डोंगरे. ६ गो. ब. देवल. ७ वि. ना. आपटे. ८ खं. चिं. बेदरकर.

———

८

या आठ असामींनीं ब्रह्मकूर्चोपवासपूर्वक यथाशक्ति दक्षिणादान करावें.

४ चहा घेतलेलेः—

१ बा. गं. टिळक २ रा. मो. साने. ३ वा. ग. जोशी. ४स. ग. जोशी. (परांजपे?)

यांपैकीं टिळक यांनीं श्री काशीस जाऊन सर्वप्रायश्चित्त घेतलें आहे व येथेंही दोन कृच्छ्रें प्रायश्चित्त केलेलें आहे असें खात्रीलायक कळविलें आहे. सबब यांनीं प्रायश्चित्त घेण्याचें कारण नाहीं, बाकी तिघांनीं एक चांद्रायण व सांतपन यथाशास्त्र घ्यावें.

१६ गैरहजर असणारेः—

१ वा. वा. केळकर. २ अ. ग. वांगीकर. ३ ज. वि. कुळकर्णी. ४ के. पां. गोडबोले. ५ माधवराव जोशी. ६ गो. कृ. गोखले. ७ वि. गो. सासवडकर. ८ वि. त्रि. चिपळूणकर. ९ रा. वा. मोडक. १० वै. का. राजवाडे. ११ क. वा. धामण. १२ ना. स. पानसे. १३ गं. वि. जोशी. १४ शंकरराव जोशी. १५ सी. ना. अंकलेकर. १६ गो. ल. काजवेकर.

----

१६

सदरहू सोळा इसम हजर झाले नाहींत व चहा न घेतल्याबद्दल खात्री झाली नाहीं सबब यांनीं १ सांतपन व चांद्रायण प्रायश्चित्त यथाशास्त्र घ्यावें.

हीं प्रायश्चित्तें माधव, विज्ञानेश्वर, मयूख वगैरे ग्रंथांचा व संमतीपत्रांचा **बलाबलाधिकरणन्यायानें** विचार केला असतां इतकें प्रायश्चित्त जरी येत नाहीं तथापि दोषाचा अपवाद व कालविलंब वगैरे कारणें मनांत आणून सांगितलीं आहेत.

८ ज्ञाताज्ञात दोष निवारणार्थ प्रायश्चित्त घेण्याबद्दल अर्ज दिल्हे तेः—

१ सि. ग. देवधर, २ वि. मो. भिडे, ३ गो. वा. कानिटकर, ४ प्र. गो. नरवणे, ५ वामनराव रानडे, ६ वामनराव परांजपे, ७ चिं. ना. भट, ८ माधवराव रानडे.

या गृहस्थांनीं यथाशक्ति सर्वप्रायश्चित्त घ्यावें. चिंतामण नारायण भट यांनीं काशीस सर्वप्रायश्चित्त केल्याची खात्री केल्यास आतां करण्याचें कारण नाहीं.

या ठरावावर अपीलअर्जानें आलेल्या तक्रारी व पुराव्याच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल जाहलेल्या टीका व जाहलेले कागदपत्र पाहून अभिप्राय कळविण्यांत येतो तो.

या कामीं पुरावा ह्मटला ह्मणजे वादीपक्षाकडे नि० ७६ चा केशव लक्ष्मण देशपांडे व प्रतिवादीकडील नि० १३१ चा रामकृष्ण भिकाजी कुळकर्णी असे दोन साक्षिदार आहेत. यांवांचून माजिस्त्रेट कोर्टापुढें यांतील प्रतिपक्षकारांच्या जाहलेल्या जबान्यांच्या नकला व पत्रें व शिवाय वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध जाहलेले लेख असा आहे. यांतील कोणता ग्राह्य करणें योग्य आहे याचा प्रथम विचार करणें जरूर आहे.

**हा धर्मसंबंधी तंटा आहे तेव्हां धर्मशास्त्राचे जे नियम आहेत त्यांस अनुसरून** व सांप्रतची लोकस्थिति मनांत आणून विचार करणें योग्य होईल. **धर्मसंबंधी तंट्यांत कायद्याचे नियमाकडे लक्ष देणें वाजवी नाहीं.** युरोपियन लोकांच्या जबान्यांच्या नकला व पत्रें, हे लोक स्ववर्णांतील नसल्यामुळें केवळ घेतां येत नाहीं असें जरी शास्त्रावरून होत नाहीं तरी या लोकांच्या सांगण्याची कसोटी पाहण्यास या प्रतिपक्षकारांस या खटल्यांत संधी मिळाली नाहीं ह्मणून व ज्या लोकांनीं धर्मांतर केलें त्यांचे जबाब अगर त्यांच्या नकला या कामीं पुराव्यास ग्राह्य नाहींत.

वर्तमानपत्रें उभयपक्षीं हजर जाहलीं आहेत परंतु त्यांतील मजकूर शाबीत जाहले नाहींत ह्मणून ते लेख घेतां येत नाहींत तरी **त्यांत जी वाटाघाट जाहली ती लोकवार्ता ह्मणून पुराव्यास ग्राह्य होईल.** शिवाय नि० ७६ व १३१ हे दोन साक्षीदार काय ते प्रत्यक्षतेचे एवढ्या पुराव्यावर हा कज्जा अवलंबून आहे.

श्रीचे अधिकारी नि० ७६ चे साक्षीदारावर **भरंवसा न ठेवण्यास जीं कारणें दाखवित आहेत तीं समाधानकारक**

नाहींत. कारण, लेले हा बाट्या असल्यानें व वर्तमानपत्रें शाबीत न जाहल्यामुळें व युरोपियन लोकांच्या जबानींतील मजकुरावरून या साक्षीस दूषणें दिलीं आहेत. शिवाय सभेच्या रचनेबद्दल व व्यवस्थेबद्दल जी हकीगत सांगितली त्यास वरील पुराव्यानें व इतर गोष्टीनें विरुद्धता येते असें दर्शविलें आहे. परंतु हें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, जे आधार प्रथमदर्शनीं पुराव्यांतून गाळले तेच या साक्षीदारांच्या व वादींच्या पुराव्यांस लागू करून या साक्षीदारांचा व पुराव्याचा बेभरंवसा मानला हें वाजवी नाहीं. नि. ७६ चा साक्षीदार प्रत्यक्ष पाहिलेली हकीगत सांगत आहे व त्याच्या सांगण्यास टिळक यांचा जबाब नि० ११६ व प्रतिवादींनीं आपल्या बचावाकरितां ह्मणून दिलेला साक्षीदार नि० १३१ चा कुलकर्णी यांच्या जबाबावरून नि० ७६ चे सांगण्यास पुष्टि येत आहे. या साक्षीविषयीं दुसरें एक कारण असें दर्शविलें आहे कीं पंडित याणीं चहा घेतला नाहीं असें माजिस्त्रेट कोर्टांत शाबित झालें असतांहीं सर्वांनीं चहा घेतला असें ह्मणतो हें सांगणें भरंवशाचें नाहीं असें मानिलें आहे. त्यास प्रतिपक्षकार टिळक वगैरेनीं जो नि. १३ चा अर्ज पांच हौद मिशनगृहांत गेलेल्या लोकांची यादी दिली आहे, त्या अर्जांतच असें ह्मणतात कीं “पंडित यांचे कज्याचा निकाल होऊन दोनशें रुपये दंड जाहला. हा दंड योग्य जाहला आहे कीं नाहीं हें अपिलाचा निकाल होईपर्यंत सांगतां येत नाहीं. तथापि, एवढ्यानें पुणें वैभवांतील मजकूर खोटा ठरला असें होत नाहीं. वर्तमान पत्रकारांचा व श्रीचा अधिकार भिन्न असोन श्रीस यासंबंधीं चौकशी करण्याचा पूर्ण अधिकार आहे असें माजिस्त्रेट कोर्टांत शाबित झालें आहे.” असें ह्मटलें आहे. तसेंच पुढें “मिशनगृहांत घडून आलेला प्रकार खालीं सही करणारांस प्रत्यक्ष माहीत आहे. तेथें पुष्कळ लोकांनीं चहा घेतला आहे” असें ह्मटलें आहे. शिवाय आणखी असेंही लिहिलें आहे कीं “मिशनगृहांत चहा ख्रिस्ति लोकांकडून होणार आहे असें ठाऊक असून तेथें जे लोक गेले होते त्यांचीं नांवें पुणें-वैभवांत प्रसिद्ध जाहलीं आहेत व त्यांपैकीं बहुतेक मंडळींनीं चहा घेतला होता.” या अर्जावरून व नि० १३१ चा साक्षीदार आपले जबाबांत न घेणारे असामी १९ असावेत असें ह्मणून जमलेले लोक ६० पासून ७० होते, त्यांत ख्रिश्चन वीस असावेत असें सांगतो. ही संख्या अजमासाची आहे, तरी नि० १३ च्या अर्जदाराचें ह्मणणें व नि० ११६ टिळक यांचा जबाब यावरून नि० ७६ चा देशपांडे हा सर्वांनीं चहा घेतला असें सांगतो त्यास पूर्ण बळकटी येत आहे. आतां नि० १३१ चा साक्षीदार—पाटणकर, देवल, आपटे, डोंगरे,—यांनीं चहा घेतांना पाहिलें नाहीं ह्मणतो. देशपांडे यानें जीं नांवें १९ इसमांचीं सांगितली त्यांत हे चार इसम येत आहेत. यावरून कोणाचें सांगणें विश्वसनीय मानावें याचा थोडा विचार केला तर देशपांडे हा जसजशी हकीकत घडून आली तसें सांगत आहे. व नि० १३१ चा हा उडवाउडवीचीं उत्तरें देत आहे. जेथें प्रतिवादींच्या विरुद्ध सांगण्याचा प्रसंग आला तेथें तेथें विचारले प्रश्नांचीं उत्तरें देण्यास नाकारलें आहे. यावरून सत्य बाहेर पडूं नये असा या साक्षीदाराचा पूर्ण हेतु दिसून येत आहे.

सबब कुळकर्णी याजपेक्षां देशपांडे यांचें सांगणें खरोखर विश्वसनीय मानलें पाहिजे. ठराव करणारांनीं फिर्यादीमध्यें अभियोग आणि विज्ञप्ति असे दोन भेद दाखवून अभियोग करणारांचा पुरावा नसल्यामुळें विज्ञप्तीकडे लक्ष देऊन विचार केला आहे. त्यास, या धर्मसंबंधी तंट्यांत खरोखर ह्मटलें ह्मणजे अभियोग करणारे व विज्ञप्तीनें कळविणारे यांत दोहोंमध्यें अंतर आहे असें वाटत नाहीं. जर अभियोग करणारे पुराव्यास सिद्ध न राहते तर विज्ञप्तीच्या संबंधानें श्रीस विचार करणें जरूर होतें. अभियोग करणारांनीं आपली इतकी सिद्धता ठेविली नसती तर हा दोषारोप अपवादा खालीं आला असता असें मानावें लागलें असतें. अभियोग करणारांनीं इसम कमी केले ते दोषी होते कीं नाहीं याचा निर्णय झालेला नाहीं. जीं वर्तमानपत्रें आधार मानतां येत नाहींत तींच आधार धरून ठराव करणारांनीं इसम कसे सोडले कळत नाहीं. टिळक आपले जबाबांत पाटणकर व पटवर्धन या दोघांनीं चहा घेतला नाहीं असें ह्मणत आहेत. येवढ्यावरून या लोकांपुरताच पुरावा मानावा तर नि० ५७ चे जबाबांत हकीगतीच्या संबंधानें प्रश्न उत्पन्न होण्याबरोबर साक्षीचा प्रश्न ह्मणून उत्तर देण्यास नाकारलें आहे. यास्तव, नि० ११६ तील मजकूर फक्त टिळकापुरताच त्यांचे विरुद्ध ग्राह्य होईल.

चहा घेतला नाहीं असें सिद्ध झालें ह्मणोन ८ असामींस प्रायश्चित्त सांगितलें आहे. जर चहा घेतला नाहीं हें सिद्ध होतें तर प्रायश्चित्त सांगण्याचें प्रयोजन नव्हतें, तें कां सांगितलें याचा हेतु कळत नाहीं. आतां संसर्ग घडला किंवा अपवादाबद्दल ह्मणून हें प्रायश्चित्त आहे असें ह्मणावें तर ठरावांत तसा उल्लेख करणें जरूर होतें. तसें न झाले मुळें प्रायश्चित्त कडक झालें असें ह्मणण्यास प्रतिवादींस सवड झाली. नि. ७६ चा साक्षीदार खंडेराव वेद्रकर यांचें नांव स्पष्ट सांगत आहे व पंडित यांच्याबद्दल तर नि० १३ चे अर्जावरून विचार करणें जरूर होतें. बाकी सहा राहिलेपैकीं पाटणकर, देवल, डोंगरे, आपटे या चारीं बद्दल नि. १३१ चा साक्षीदार सांगतो पण बहुतेक या शब्दावरून व इतर गोष्टीवरून त्या साक्षीदाराचें सांगणें विश्वसनीय नाहीं असें ठरविलेंच आहे. बाकी दोन्हींबद्दल तर कांहींच पुरावा नाहीं. सबब, या आठ आसामींनीं चहा घेतला नाहीं असें निर्णयात्मक ह्मणणें चुकीचें आहे असें आह्मास वाटतें. ज्ञाताज्ञात दोषाबद्दल आठ इसमांस प्रायश्चित्त सांगितलें. यांपैकीं कानिटकर, भिडे, नरवणे, रानडे, भट यांजबद्दल नि. ७६ चा साक्षीदार स्पष्ट नांवें सांगत आहे व वामन बाळकृष्ण रानडे यांज बद्दल नि. ७६ व नि. १३१ या दोन साक्षींनीं सिद्ध होतें. बाकी राहिलेले दोन, देवधर व परांजपे यांचीं नांवें पुराव्यांत कोठें आलीं नाहींत तरी सामान्यतः बहुतेक लोक होते असें नमूद होत गेलें आहे त्यांत समावेश होऊं शकेल. त्या ठिकाणीं चहा न घेणारे कोण हें ज्या पेक्षां स्पष्टपणें निर्दिष्ट होत नाहीं त्या अर्थी यांजवर अपवाद आहेच. केवळ सर्व लोक ज्ञाताज्ञात दोषाबद्दल जो निर्णय केला तो चुकीचा आहे.

१६ असामी गैरहजर आहेत ह्मणून त्यांजवर चहा घेतल्याची सर्वांवर साक्षी शाबिती मानली आहे यास आधार कांहीं

दिसत नाहीं. नि. ७६ चा साक्षीदार केळकर, ना० स० पानशे, मोडक आणि वांगीकर असे चतुर्वर्गाचीं नांवें नमुद करीत आहे. बाकी १२ बद्दल कोठें पुराव्यांत नांवें आलेलीं नाहींत; तेव्हां सर्वांवर सारखा दोषारोप ठेविलेला चुकीचा आहे.

चार असामी कबूल करितात त्याजबद्दल ठरावांत निर्णय केलेला आहे तो दोषारोप बरोबर आहे असें दिसतें.

**हा चहा ख्रिश्चन लोकांकडून होणारा नव्हता अशी कितीएकांनीं आपली समजूत झाली होती असें दर्शित केलें आहे तें बरोबर नाहीं. नि० १३, ७६ व १३१ पहा.** तारीख ४ अक्टोबर सन १८९० इसवी रोजीं जी पांच हौद मिशन गृहांत मीटिंग भरली या मीटिंगला सोशीएवल असें म्हटलें आहे. सोशिएवलचा अर्थ कांहींही असो. त्याठिकाणीं चहा व बिस्किटें वांटण्यांत आलीं होतीं हें निर्विवाद आहे. ग्रहण करणें व न करणें हें मात्र ज्याचे त्याचे इच्छेवर होतें. कारण **सक्ती जाहल्याचें कोणींही दाखविलें नाहीं, किंवा ग्रहण करण्याजोगा कांहीं प्रसंगच होता असें निष्पन्न झालें नाहीं. तेव्हां स्वेच्छेनें ज्यांनीं जो पदार्थ सेवन केला असेल तो त्यांनीं बुद्धिपुरःसरच केला आहे असें दिसतें.**

जातीचीं बंधनें मोडावीं या हेतूनें कोणीं कांहीं पदार्थ सेवन केला असेल असें मानण्यास कांहीं सबळ कारण दिसत नाहीं.

बिस्किटें वांटण्यांत आलीं होतीं हें प्रतिपक्षकारासही कबूल आहे. सेवन केल्याच्यासंबंधानें देशपांडे हा सांगत आहे पण जशी चहाबद्दल अन्य तऱ्हेनें त्याचें सांगण्यास पुष्टि येत आहे त्याप्रमाणें बिस्किटाबद्दलचे सांगण्यास कांहीं प्रत्यंतर नाहीं. एकंदर १९ इसमांचीं नांवें सांगून पुढें बिस्किटें खाल्लीं असें सांगून नंतर उलट तपासणींत कोठेंही सांगितलें नाहीं. अखेर मात्र चहा बिस्किटें मजवांचून सर्वांनीं घेतलीं असें म्हटलें आहे. "जात मोडली असें तुम्ही कशावरून म्हणतां" म्हणून उलट तपासणींत प्रश्न झाल्यावेळीं **"ब्राह्मणेतर मनुष्याच्या हातून चहा घेतला सबब जात मोडली असें मीं समजतों,"** म्हणून जबाब दिला आहे. तथेंही बिस्किटाबद्दल कांहीं सांगत नाहीं. सबब बिस्किट खाल्ल्याचा संशय आहे. **धर्मशास्त्राप्रमाणें संशय हा एक अपवाद मानिला आहे व हा अपवाद लोकवार्तेंतही प्रसिद्ध आहे. यासाठीं बिस्किटें खाल्ल्याचा संभवनीय अपवाद आहे असें दिसतें.**

पूर्वी जे लोक अन्यकारणानें बहिष्कृत होते त्यांजला ठरावांत गोंवून शुद्धि केलेली आहे अशी एक तक्रार आहे. पण असे पूर्वीचे दोषी कोण आहेत याचा उल्लेख केलेला नाहीं व ठरावांतही यासंबंधानें कांहीं उल्लेख नाहीं. पूर्वीचे बहिष्कृत कोण आहेत याचा **श्रीकडील दप्तरीं तपास होऊन तशी गोष्ट असेल तर अलाहिदा श्रीकडून विचार होण्याचा आहे या कामांत पूर्वीचे कोणतेही दोषारोपाचा विचार होण्याची जरूर नाहीं असें दिसतें.**

**टिळक व भट यांचें प्रायश्चित्त झालें अशाबद्दल अधिकारी यांचें जें मत आहे तें आह्मास पसंत नाहीं. सर्व प्रायश्चित्त हें घडलेले दोषांबद्दल उक्त प्रायश्चित्त नव्हे याकरितां जाहलेलें प्रायश्चित्त बरोबर वाटत नाहीं.**

प्रथम ४६ इसमांवर दोषारोप आणिलेला आहे. प्रतिपक्षकार यांचे नि० १३ चे अर्जावरून ३९ इसम मिशनगृहांत गेल्याची यादी दाखल जाहली आहे. त्यावरून पाहिलें तर ७ इसमांचें अंतर येत आहे ते लोक खालीं लिहिल्याप्रमाणें.

१ कुळकर्णी १ मराठे १ जोशी १ पानशे १ लेले १ देवस्थळे १ ह. ना. आपटे असे सात इसम नमूद होतात. तेव्हां खरे किती गेले होते हें समजण्यास अन्य तऱ्हेनें साधन कांहीं पुढें आलेलें नाहीं. तेव्हां यांत जे ब्राह्मण जातीचे लोक आहेत हे गेले होते कीं नाहीं याचा संशय आहे. व असाच मनोगत वादीपक्षाचाही आहे.

एकंदर हकीकतीवरून या कामीं कोणावर कसा दोषारोप आहे याबद्दल आमचा अभिप्राय खालीं लिहिल्याप्रमाणें कळवीत आहो.

३ ब्राह्मणांखेरीज इतर लोक कमी केले ते.

१ रा० भि० कुळकर्णी १ रा० बा० लेले १ वि० ना० गुजर या तिघा असामींस कमी केलें आहे तें बरोबर आहे.

४ मिशनगृहांत गेले होते असें शाबीत होत नाहींत ते.

१ मराठे १ ह. ना. आपटे १ देवस्थळे १ रा. भि. जोशी हे चार इसम गेले होते असें सिद्ध होत नसल्यानें यांस कमी केले.

३ ब्रह्मवृंदाकडून निकाल जाहलेले.

१ आठवले १ पटवर्धन १ गो. ह. पानशे. या त्रिवर्गांनीं ब्रह्मवृंदाकडून प्रायश्चित्त घेतलें आहे. सबब त्यांबद्दल आतां पुन्हां विचारण्याचें कारण नाहीं.

सदरीलप्रमाणें दहा असामी जातां राहिले असामी ३६ याबद्दल खालीं लिहिल्याप्रमाणें.

१५ चहा घेतल्याबद्दल.

१ टिळक १ जोशी १ साने १ परांजपे. हे चार चहा घेतल्याचें कबूल करितात.

१ बेदरकर १ भिडे १ भट १ म. गो. रानडे १ ना. स. पानशे १ वांगीकर १ कानिटकर १ नरवणे १ रानडे १ केळकर १ मोडक ह्या अकरा असामींनीं चहा घेतल्याचें साक्षीवरून होत आहे. आतां बिस्किटांसंबंधानें पंधरा असामींवर संभवनीय अपवाद दोषारोपाचा आहे असें दिसतें.

२१ चहा घेतल्याचा व बिस्किटें सेवन केल्याचे संभवनीय अपवादाचे दोषारोपाखालीं येतात ते इसम.

१ डोंगरे १ देवल १ फडके १ सोमण १ परांजपे १ गडबोले १ सासवडकर १ जोशी १ धामण १ काजवेकर १ गं. वि. जोशी १ वि. ना. आपटे १ पाटणकर १ पंडीत १ देवधर १ कुळकर्णी १ चिपळूणकर १ गोखले १ राजवाडे १ अंकलीकर १ शंकर जोशी. एकंदर चहा बिस्किटें सेवन केल्याबद्दलचा संभवनीय अपवाद आहे असें वाटतें. अपराधाचा संशय आहे तर त्याचा फायदा अपराध्यास मिळणें व्यवहाराच्या चालू न्यायानें बरोबर दिसतें. परंतु असें करण्याचा चालू कायद्याचें तत्त्व संशयावरून एका निरपराध्यास शिक्षा देण्यापेक्षां अनेक अपराधी सुटले तरी बरें असें आहे. तें व्यवहारदृष्ट्या ठीक आहे. पण धर्मशास्त्राचें तत्त्व अशा कामीं वेगळें आहे म्हणजे मनुष्याचें वर्तन पापासही पात्र असूं नये. म्हणून संभवनीय अपराध्यास प्रायश्चित्त सांगितलें आहे. याकरितां संशयाचा फायदा प्रतिपक्षकारांस दिला तर प्रायश्चित्त-

शास्त्रास व्यत्यय येणार-याकरितां अपवादाचें प्रायश्चित्त होणें जरूर आहेसें वाटतें.

* सांसर्गी लोकांबद्दल ठरावानंतर शुद्धिपत्र निघालें; तेव्हां ज्या लोकांनीं प्रायश्चित्त घेतलें असें समजून त्यांच्याशीं ज्यांनीं संसर्ग ठेविला असेल तो संसर्ग ते शुद्ध जाहले असें समजून जाहला आहे असें दिसतें व याबद्दल श्रीकडून जें नंबर ९७ चें पत्र ब्रह्मवृंदास मिळालें आहे त्या विरुद्ध आतां आमचें मत आहे असें नाहीं.

वर जो आम्हीं दोषारोप दाखविला आहे त्याचे प्रायश्चित्ताबद्दल व पूर्वी सांगितलीं तीं प्रायश्चित्तें याचा विचार शास्त्रीसभेकडून श्रीकडून व्हावयाचा आहे."

---

बार अंक ४९ शके १८१९ चे पत्रांत.

" उभयतां " ( कुरुंदवाडकरां ) " कडून संसर्गी लोकांकडेही कांहीं दोष नाहीं अशा प्रकारचे अभिप्राय आले आहेत. " तर याप्रमाणें आपले अभिप्राय गेले आहेत कीं काय अशाबद्दल श्रीमंत राजश्री बापुसाहेब व बाळासाहेब कुरुंदवाडकर यांस विचारतां बापुसाहेब यांनीं आपला अभिप्राय दाखविला व सांगितलें कीं "संसर्गी लोक जर श्रीचे अधिकाऱ्याचे शुद्धिपत्रावरून प्रतिवादींपैकीं ज्यांबद्दल शुद्धिपत्र देण्यांत आलें

* ( श्री० बापुसाहेब कुरुंदवाडकर यांनीं श्रीस पत्र पाठविलें तें ).

" सेवेसी विनंति. सेवक गणपतराव हरिहर साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत मित्ति आश्विन वद्य १ शके १८१९ पावेतों श्रीकृपें असे विज्ञप्ति.

पुणें येथील चहापार्टी ग्रामण्यप्रकरणीं श्रीचे अधिकारी यांनीं जो ठराव केला होता त्याजवर संस्थानाकडे अपील होऊन काम चालू आहे त्याचाच शेवट अद्याप होणें आहे.

मध्यंतरीं सांसर्गिक लोकांस प्रायश्चित्त पाहिजे कीं नको या विषयावर चर्चा सुरू होऊन शुद्धिपत्र जाहलें आहे असें समजून ज्यांनीं संसर्ग केला असेल त्यांस प्रायश्चित्त देण्या घेण्याची जरूर नाहीं व याचप्रमाणें इकडील मत आहे अशा आशयाचें आज्ञापत्र संस्थानांतून ब्रह्मवृंदास देण्यांत आलें. त्याजवरून इकडील अभिप्राय असाच आहे कीं काय, तें कळवावें म्हणून कित्येक गृहस्थांकडून इकडे सूचना आल्या. त्याजवरून आमचा अभिप्राय पहातां तसें नमुद केल्याचें आढळत नाहीं. आमचे अभिप्रायांत इतकेंच आहे कीं यांजबद्दल श्रीकडून नंबर ९७ चें पत्र ब्रह्मवृंदास मिळालें आहे त्याविरुद्ध आमचें मत आहे असें नाहीं. नंबर ९७ चे पत्रांत असें म्हटलें आहे कीं "चहापार्टीच्या ग्रामण्यासंबंधीं संस्थानीं काम चालू आहे त्याचा अखेर निकाल होईपावेतों प्रायश्चित्त देऊन शुद्ध करणें अगर निग्रह करणें हा अधिकार संस्थानचा आहे" वगैरे पुढें आणखी बराच मजकूर लिहिला आहे त्याजवर इकडील भरंवसा आहे. वास्तविक पाहिलें तर हल्लीं चालू असले प्रकरणाचा निकाल झाल्याशिवाय सांसर्गिक लोकांचा निकाल होणें इष्ट नव्हतें. असो, प्रस्तुत जें काम चालू आहे त्यांतही वर दर्शविलेप्रमाणें गैरसमज होऊं नये यासाठीं निकाल प्रसिद्ध होण्यापूर्वी या गोष्टींचा चांगला विचार व्हावा आणि इकडील म्हणणेबद्दल जर कांहीं संशय उत्पन्न होईल तर त्याजबद्दल आज्ञा झाली असतां विनंति करण्यास बरें पडेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. "

त्यांजबरोबर त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें अशा खरोखर समजुतीनें संसर्ग करीत असतील तर ते व्यवहाररीत्या दोषी नाहींत असें माझें मत आहे. शास्त्रीयरीत्या त्यांजकडे दोष येतो. परंतु, दोषी लोकांबद्दल (प्रायश्चित्ती व तत्संसर्गी ) शास्त्ररीत्या शास्त्रिमंडळाकडून विचार व्हावा असें अभिप्रायांत मीं श्रीस स्पष्ट कळविलें असतां त्याचा विचार श्रीनीं केला नाहीं व बार अंक ४५ यांतही तसे रीतीचा उल्लेख स्पष्ट केला नाहीं. यामुळें बार अंक ४५ चें पत्र मला मान्य नाहीं. शिवाय, मुख्य प्रतिवादींचा निकाल केल्याखेरीज संसर्गी यांचा निकाल करतांच येत नाहीं." या मजकुरावरून श्रीमंत बापुसाहेब यांचा संपूर्ण अभिप्राय व त्यांचे टिपेंत दिलेलें आश्विन वद्य १ शके १८१५ मित्तीचें पत्र पाहिलें ह्मणजे संसर्गी यांस प्रायश्चित्त नको असें जें श्रीनीं श्री बापुसाहेब यांच्या अभिप्रायाबद्दल नंबर ४५ चे पत्रांत लिहिलें तें बरोबर नाहीं असें स्पष्ट समजून येईल. या अभिप्रायावरून अधिकारी यांचा ठराव पुष्कळ मुद्यांबद्दल रद्द केला आहे, कांहींत दुरुस्ती केली आहे, प्रायश्चित्तेंही पुष्कळ प्रतिवादींचीं फिरविलीं आहेत व कांहीं प्रतिवादींचीं झालेलीं प्रायश्चित्तेंही योग्य झालीं नाहींत असें सिद्ध झाल्याचें कळून येईल.

जर अधिकारी यांचा ठराव प्रायश्चित्तें वगैरे सुद्धां फिरला तर त्यांजबरोबर ज्यांनीं संसर्ग केला ते दोषी आहेतच असें सिद्धच असल्यामुळें येथें त्याची वाटाघाट करण्याचें कारणच नाहीं. शिवाय संसर्ग करणारांनीं सरळ मनानेंच जर तो शुद्धिपत्रावरून केला असता तर त्यांनीं रा० ब० रानडे यांचें ता० २६ मे १८९३ चें पत्र प्रसिद्ध होतांच ज्यांणीं प्रायश्चित्तें घेतलीं ह्मणून शुद्धिपत्रांत नमूद केलें होतें, त्यांचीं प्रायश्चित्तें झालीं नसल्याचें त्या पत्रावरून स्पष्ट होत असल्यामुळें, त्यांच्याशीं लागलींच संसर्ग बंद केला असता. परंतु तसें कांहीं एक न करितां बार अंक ९७ चें पत्र प्रसिद्ध होईपर्यंत बेधडक उघडपणें संसर्ग करीत होते.

आतां बार अंक ९७ शके १८१४ व बार अंक ४५ शके १८१५ या पत्रांत संसर्ग्यांना प्रायश्चित्त नको अशी जी श्रींनीं आज्ञा दिली आहे ती किती अयोग्य आहे हें ९७ व ४५ पत्रांतील आज्ञा देण्यापूर्वी व नंतर ज्या श्रीकडूनच आज्ञा करण्यांत आल्या आहेत, त्यांवरून स्पष्ट होत आहे.

( नि० ९. बार अंक १३९ श्रा० शु. ३ श० १८११ चें श्रीकडून मोरगांव, सुपें व जेजुरी येथील ग्रामस्थांस दिलेलें पत्र शके १८१३ भाद्रपद शुद्ध २ मित्तीचे जगद्धितेच्छु वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे, त्यांतील कामा पुरता उतारा. )

[ धर्मविरुद्ध वर्तन करणाऱ्या स्त्रीचा संसर्ग झाला, ] " सबब पंचक्रोशीचे ब्रह्मवृंदांनीं सदर बापू यास अपंक्त केला असून पंचक्रोशींतील विद्वानास व श्रीकडील मठाधिकारी यांस न कळवितां मोरगांवचे कांहीं मंडळींनीं सदर बापू यास पंक्तीस घेतला ह्मणोन मोरगांव व सुपें व जेजुरी ब्रह्मवृंदाचा अर्ज आल्यावरून चौकशी चालले कामीं सदर बापू याणेंही अर्ज केले ते आपण सदरचे दोषाबद्दल प्रायश्चित्त घेतलें ह्मणून लिहिलें त्याजवरून चौकशींत झाले

**कागदपत्रावरून पहातां** बापू हा प्रायश्चित्त घेतलें ह्मणतो, तें प्रायश्चित्त झालें असावें **असें दिसून येत नाहीं.** करितां सदर बापू हा संस्थानीं येऊन आपलेवरील दोषाची निष्कृति करून दुसरें आज्ञापत्र आणिजेपर्यंत कोणीं अन्नोदकादि वहिवाट न करण्याचा बंदोबस्त ठेवावा व **मोरगांवचे कांहीं मंडळींनीं बापू यास पंक्तीस घेऊन अन्नोदकाची वहिवाट केली तेहीं लोक संस्थानीं येऊन आपापलेवरील सांसर्गदोषाबद्दल निष्कृति करून आज्ञापत्र आणिजेपर्यंत त्यांजबरोबरही अन्नोदकाची वहिवाट न करण्याचा बंदोबस्त ठेवावा.** "

या आज्ञापत्रावरून पुण्याचे चालू ग्रामण्यांतील संसर्गी व मोरगांवचे ग्रामण्यांतील संसर्गी यांचें अगदीं साम्य आहे; तें असें. शुद्धिपत्र दिल्यानंतर श्रीकडून जें ९९ नंबरचें आज्ञापत्र निघालेलें तिसऱ्या पृष्ठावर दाखल केलें आहे त्यांत " **ठराव व प्रायश्चित्ताचा** वगैरे संशय दिसत आहे " असा मजकूर असून नि० ९ यांतही " **कागदपत्रावरून पहातां बापू हा प्रायश्चित्त घेतलें ह्मणतो तें प्रायश्चित्त झालें असावें असें दिसून येत नाहीं.** " असें आहे. ९९ चे आज्ञापत्रांत वर्तमानपत्रांतील लेखावरून श्रीला **ठरावासुद्धां** प्रायश्चित्ताचा वगैरे **संशय** आहे. नि० ९ यांत निर्दिष्ट असलेलें **प्रायश्चित्त श्रीस मान्य** असून कागदपत्रावरून तें न झाल्याचा **संशय** आहे. रा. ब. रानडे यांनीं ता. २६-९-९२ चें पत्र बांबेग्यॅझेटांत प्रसिद्ध केलें त्यांत देकार करण्यापेक्षां प्रतिवादी यांनीं **प्रायश्चित्त मुळींच केलें नाहीं** असें ते ह्मणतात. नि० ९ यांत बापु हा **प्रायश्चित्त घेतलें** ह्मणतो हें श्रीनींच कबूल केलें आहे. याप्रमाणें स्थिति असतां मोरगांवचे लोक बापूशीं संसर्ग केल्याबद्दल अन्नोदकादि व्यवहारास अयोग्य होतात आणि या ग्रामण्यांतील प्रतिवादीशीं संसर्ग करणारे **शुद्ध आहेत** असें श्रीकडून आज्ञापत्र निघतें. यावरून ९७ व ४९ नंबरचीं पत्रें सर्वस्वीं धर्मशास्त्र व श्रीचे मठांतील संप्रदाय यांच्या विरुद्ध असल्यामुळें कोणतेही बाजूनें विचार केला तरी **संसर्गी हे दोषी आहेतच** असें कळून येईल.

ज्यांतील मजकुराचा हवाला बार अंक ४९ श० १८१९ चे आज्ञापत्रांत दिला आहे तें ९७ नंबरचें आज्ञापत्र निघाल्यानंतर बार अंक ३९ व ४० शके १८१९ चीं आज्ञापत्रें अनुक्रमें पुणें व वाई येथील ग्रामस्थांस ह्मणून आलीं. त्यांत काशिनाथ वामन लेले यांस अन्नोदकाचा संसर्गदोष असल्याबद्दल त्याजबरोबर ब्रह्मवृंदांनीं अन्नोदकादिव्यवहार बंद ठेवावा असें लिहिलें आहे. त्या कामीं लेले यांनीं श्रीस अनेक वेळां—" ज्या व्यक्तीच्या संसर्गाबद्दल मजबरोबर अन्नोदकादिव्यवहार बंद ठेवण्याची आज्ञा दिली त्या मुख्य व्यक्तीस अगर घरास ज्ञातीकडून अगर श्रीकडून बहिष्कार नाहीं इतकेंच नव्हे तर माझ्याप्रमाणें ज्यांस संसर्ग झाला आहे त्यांचा संसर्ग खुद्द श्रीस झाला "—असें कळविलें असून लेले यास संसर्गाबद्दल दोषी ह्मणून श्री ठरवितें. आणि चहा बिस्किटाबद्दल ज्ञातीनें निग्रह केलेल्या प्रतिवादीशीं संसर्ग करणारे शुद्ध असें श्रीच ह्मणते. तेव्हां यांतील गौडबंगाल काय असावें बरें ?

या कामीं श्रीमंत बापुसाहेब कुरुंदवाडकर यांनीं आपल्या अभिप्रायांत दोषी लो-

कांबद्दल शास्त्रीमंडळाचा अभिप्राय घ्यावा अशी श्रीस विनंति केली आहे. रावसाहेब माधवराव मोरेश्वर भडकमकर यांच्या अभिप्रायांतील मतलब बहुतेक श्रीमंत बापुसाहेब कुरुंदवाडकर यांच्या अभिप्रायाशींच जुळत आहे यामुळें तो अभिप्राय छापला नाहीं. कुरुंदवाड मुक्कामीं चौकशी झाल्यानंतर चौकशीचे वेळीं जे शास्त्रीमंडळ तेथें जमलें होतें त्यांस खालीं लिहिलेल्या तात्पर्याचे लेखी प्रश्न केल्या कामीं त्यांनीं दिलेला **अभिप्राय दाखल करून प्रतिवादी व तत्संसर्गी दोषी असल्याबद्दल** आपल्या अभिप्रायांत **स्पष्ट उल्लेख केला आहे**. तो शास्त्रिमंडळींचा अभिप्राय वे. शा. सं. बाळाचार्य गजेंद्रगडकर राहणार सातारा यांनीं पाठविलेला खालीं (निशाणी ४ यांत) दाखल केला आहे.

नि० ४ कारभारी यानीं केलेल्या प्रश्नांचें तात्पर्य व त्यांचीं उत्तरें.

१ झालेलीं प्रायश्चित्तें बरोबर झालीं आहेत कीं काय ?—नसल्यास कशीं झालीं पाहिजेत २ समजून उमजून एकवेळ साहेब लोकांच्या हातचा चहा घेतल्याचें शाबीद झालें आहे त्यास प्रायश्चित्त काय ? ३ बिस्किटें खाल्लीं असल्यास त्यांस वेगळें प्रायश्चित्त हवें कीं काय ? त्यांत अन्नाचा अंश असतो. ४ पुनर्विवाहाचे प्रकरणीं पूर्वीं बहिष्कृत झालेले रा० ब० महादेव गोविंद रानडे व विष्णु मोरेश्वर भिडे यांनीं त्या अपराधाबद्दल कांहींएक उल्लेख न करितां चहा बिस्कीट ग्रामण्यांत ज्ञाताज्ञात दोषांबद्दल प्रायश्चित्त मिळण्याचा अर्ज केल्यावरून त्यांनीं सर्वप्रायश्चित्त घ्यावें असें ठरविलें तें योग्य झालें आहे कीं काय ? नसल्यास प्रायश्चित्त काय दिलें पाहिजे ? ५ प्रायश्चित्तें बरोबर झालीं नाहींत परंतु तीं बरोबर झालीं अशा समजुतीनें ज्यांनीं संसर्ग केला ते दोषी आहेत कीं काय ? व असल्यास त्यांना प्रायश्चित्त काय ? ६ कालानुरूप होण्यास अशक्य असलेल्या प्रायश्चित्तांतील क्रियेचा प्रत्याम्नाय काय ? अशा मतलबाचे प्रश्न कुरुंदवाड मुक्कामीं चौकशीचें काम आटोपल्यावर कारभारी यांनीं संस्थानचे साताऱ्याकडील अधिकारी व आश्रित वे० शा० सं० रा० रा० अनंताचार्य बाबा गजेंद्रगडकर प्रभृति विद्वानांस विचारले होते. त्याबद्दल त्यांनीं दिलेलीं उत्तरें खालीं दिलीं आहेत.

१ ले प्रश्नाचें उत्तर—चांडालादिस्पृष्ट मृन्मय पात्रांनीं उदक प्राशन केलें असतां सार्धकृच्छ्र प्रायश्चित्त सांगितलें असून पुनः संस्कार सांगितला आहे.

मयूखे (कामतः सकृन्म्लेच्छादिभांडोदकपाने आपस्तंबः) मद्यांधम्लेच्छभांडेभ्यो यस्त्वपः पिबते द्विजः । कृच्छ्रपादेनशुध्येत पुनःसंस्कारमर्हति

प्रायश्चित्तेंदुशेखरेः—चांडालादिभांडसंस्पृष्टांबुपाने गोमूत्रयावकं त्रिरात्रं पुनःसंस्कारश्च ।

प्रायश्चित्तमंजर्याः—तादृशेन (चांडालादिस्पृष्टेन) मृन्मयपात्रेण जलपाने सार्धकृच्छ्रम् ।

याजवरून सदर्हू (चांडालादिमृन्मयभांडस्पृष्ट चहाचें पान) दोषास सार्धकृच्छ्रपूर्वक पुनःसंस्काररूप प्रायश्चित्त सांगितलें असून त्याप्रमाणें शास्त्रीबोवांच्या ठरावांत सांगितलें नाहीं. सबब सांगितलेलें प्रायश्चित्त बरोबर नाहीं. याकरितां वरील प्रायश्चित्त सार्धकृच्छ्रपूर्वक पुनःसंस्कार सक्षौर झालें ह्मणजे दोषनाशक होईल.

२ उत्तरः—एकवेळा समजून वर नि-

दिष्ट केलेल्या लोकांच्या हातचा चहा प्याला असेल तर सार्धकृच्छ्रपूर्वक पुनःसंस्काररूप प्रायश्चित्त सक्षौर केलें पाहिजे यास प्रमाण पहिल्याच प्रश्नांत दिलें आहे.

३ उत्तरः—चहा पिण्याचें प्रायश्चित्त वर लिहिलें आहे त्यापेक्षां निराळें पुनःसंस्कारपूर्वक चांद्रायणरूप किंवा अब्दकृच्छ्ररूप प्रायश्चित्त बिस्किटाबद्दल सांगितलें आहे. यास प्रमाण.

प्रायश्चित्तेंदुशेखरेः—चांडालादिपक्वान्नाशने सर्वत्र पुनरुपनयनम् । यवनम्लेच्छान्नभोजनेप्येवम् ॥

हेमाद्रौव्यासः—चांडालान्नं द्विजो भुक्त्वा सम्यक्चांद्रायणं चरेत् । बुद्धिपूर्वंतु कृच्छ्राब्दं पुनःसंस्कारमेव च ॥

वसिष्ठः—चांडालपतितान्नभोजने पुनरुपनयनम् ।

४ उत्तरः—ज्या पातकाचा विशेष उल्लेख प्रायश्चित्तांत नाहीं व हें पाप मीं पुनः करणार नाहीं अशी प्रतिज्ञा ज्यांनीं पश्चात्तापपूर्वक केली नाहीं त्या पापाचें सर्वप्रायश्चित्तानें निरसन होत नाहीं.

प्रायश्चित्तेंदुशेखरेः—स च (प्रायश्चित्ती ) इदं पापं न पुनः करिष्यामीति प्रतिजानीयात् ।

यावरून जोंपर्यंत पश्चात्तापपूर्वक पुनर्विवाहादिकाची, प्रायश्चिती मनुष्यानें, खटपट न करण्याबद्दल प्रतिज्ञा केली नाहीं तोंपर्यंत त्या मनुष्यास प्रायश्चित्त देणें योग्य नाहीं. तस्मात् चहा बिस्किटाचे प्रकरणीं सांगितलेल्या ह्मणजे श्रीचे अधिकाऱ्यांनीं सांगितलेल्या प्रायश्चित्तानें पूर्वीचा बहिष्कार जाणार नाहीं. व यास प्रायश्चित्त आणखी काय दिलें पाहिजे असा प्रश्न आहे. त्याचें उत्तर. पुनः मी असें कृत्य करणार नाहीं अशी पश्चात्तापपूर्वक प्रतिज्ञा करून जर प्रायश्चित्ती पुरुष प्रायश्चित्त घेण्यास तयार होईल तर आह्मी याचा विचार करूं, हल्लीं करण्यास हरकत आहे.

५ उत्तरः—पूर्वी प्रायश्चित्तें अधिकारी यांनीं दिलेलीं बरोबर नाहींत असें जर दुसरे विचारांत ( अपिलांत ) ठरेल तर पूर्वीच्या श्रीच्या अधिकाऱ्याच्या शुद्धिपत्रानें ( झालेलीं प्रायश्चित्तें बरोबर झालीं नसल्यामुळें ) प्रायश्चित्तीलोकांशीं संसर्ग करणाऱ्यांस प्रायश्चित्त पाहिजे. कारण, प्रायश्चित्तीपुरुष पूर्ण विचार होऊन प्रायश्चित्त होण्यापूर्वी सदोषच आहे. ह्याला दृष्टांत. कोणी पंक्तिबाह्य ब्राह्मणेतरानें—ब्राह्मणवेष धारण करून जगद्गुरूंसमीप मी ब्राह्मण आहें, मला ब्राह्मणभोजन करावयाचें आहे, अशी विनंति करून व श्रीजगद्गुरूंची आज्ञा ब्राह्मणास कळवून—ब्राह्मणभोजन केलें. नंतर हें अपांक्तेयाचें अन्न भक्षण झालें असें समजल्यानंतर भोजन करणारे लोक प्रायश्चित्ती होतात. तेथें जगद्गुरूंचे आज्ञेवरून आह्मी गेलों सबब प्रायश्चित्त येत नाहीं असें कोणी ह्मणतील तर तें ह्मणणें अमान्य होऊन ते प्रायश्चित्त घेण्यास योग्य होतात. याप्रमाणें प्रस्तुतचा विषय आहे. यावरून हल्लींचे प्रायश्चित्ती लोकांशीं संसर्ग झालेले लोक प्रायश्चित्ती आहेत व त्यांस प्रायश्चित्त.

प्रायश्चित्तेंदुशेखरे संसर्गाख्यपातकप्रकरणेः—

मयूखेतु इतरपापिसंसर्गे तत्तद्व्रतं पादोनं कार्यमित्युक्तं. अर्थः—मुख्य पातकाच्या पाऊणपटीनें संसर्ग्यास प्रायश्चित्त आहे. परंतु हा संसर्ग वर्षभर झाला असेल तर. त्याहून कमी असल्यास तारतम्यानें प्रायश्चित्तही कमी होऊं शकेल.

६ उत्तरः—प्राजापत्याचा प्रत्याम्नाय

सालंकृत सहा धेनु, एक धेनु किंवा एक गाय. इति प्रायश्चित्तमंजर्याम् । गाईपेक्षां धेनूचें मूल्य पांचपट आहे. यवचांद्रायणे पिपीलिकाचांद्रायणे वा प्राजापत्यत्रयं अष्टौ धेनवो वृषसहिता गौश्च वा सार्धसप्त धेनवो वा पंचाशद्गावो वा अष्टौ वा गावः तिस्रो वा गावः ॥ यत्र चांद्रायणमित्युक्तं तत्र यवचांद्रायणपिपीलिकाचांद्रायणयोरन्यतरं बोध्यम् ॥ इति प्रायश्चित्तमंजर्यादौ ॥

सदर्हू प्रायश्चित्तें आह्मीं आमच्या समजुतीनें लिहिलेलीं आहेत. परंतु या कृत्यास प्रायश्चित्तच नाहीं ह्मणजे हे यावज्जीव अपांक्त आहेत असें कांहीं विद्वानांचें मत आहे ह्मणून ऐकतों. तेव्हां असें जर कोणी ठरवितील तर हा आमचा लेख रद्द आहे असें समजावें. अत्रार्थेसंमतयः

अनंताचार्य बिन नारायणाचार्य गजेंद्रगडकर, महादेव शास्त्री बिन कृष्णशास्त्री ताह्मनकर कुरुंदवाडकर वगैरे.

---

ग्रामण्याचा विषय धर्मशास्त्राचा असल्यामुळें आणि ठराव व शुद्धिपत्रांत नमूद असलेलीं प्रायश्चित्तें यांजबद्दल फारच संशय असल्यामुळें देशोदेशींचे विद्वानांनीं वादीपक्षाच्या विनंतीवरून पाठवून दिलेले अभिप्रायही निशाणे ५–११ दाखल केले आहेत.

( नि०५) ब्रह्मवृंदसभेचे चिटणीस वे. शा. सं. विष्णुशास्त्री खरे यांस वे. शा. सं. १ श्रीकृष्ण शास्त्री पाध्ये गुर्जर, २ महामहोपाध्याय भीमाचार्य झळकीकर, ३ महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस, ४ श्रीकृष्ण शास्त्री ढोरे, ५ सिताराम गोविंदशास्त्री फाटक, ६ विठ्ठल शिवरामशास्त्री तारळेकर, ७ परशराम रघुनाथशास्त्री वगवे, ८ नारायण दिनकर जांभेकरशास्त्री, ९ दिवाकरशास्त्री साधले, १० विष्णवाचार्य बिन वासुदेवाचार्य वळे, ११ काशिनाथ धोंडदेव पाध्ये गुर्जर, १२ काशिनाथ रामचंद्रशास्त्री जोशी ( सभेचे कारभारी ), १३ उद्धवाचार्य बाळाचार्य ऐनापुरे, १४ यज्ञेश्वरशास्त्री पाध्ये गुर्जर व १५ रामशास्त्री केळकर या मुंबई येथील हिंदुधर्म व्यवस्थापक सभेच्या सभासदांचें पत्र आलेलें अधिकारी यांचे पुढें चालल्या कामांत नि० ८५ यांस दाखल आहे तें.

प्रश्नः—" सभेचे तर्फे असा प्रश्न आहे कीं कोणी ब्राह्मण मंडळींनीं साहेब लोक यांचे येथें जाऊन चहा बिस्किटें सेवन केलीं त्या लोकांस शास्त्रप्रमाणें प्रायश्चित्त देऊन पंक्तिपावन होण्याचा मार्ग आहे कीं काय?" त्यांस उत्तरः—"**शास्त्रप्रमाणें हा प्रश्नच वस्तुतः करण्याची गरज नाहीं. कारण कीं तो मनुष्य पतित आहे व त्याला फिरून ज्ञातीमध्यें येण्याला कोणतेही ठिकाणीं मार्ग आढळत नाहीं.**" फक्त भीमाचार्यानीं सही करतांना "जातिसंकरीकरणोद्देशेनाभक्ष्यभक्षणे प्रवृत्तस्य प्रायश्चित्तं नास्ति इत्यर्थे संमतिः" असें लिहिलें आहे.

---

नि० ६ वे. शा. सं. महामहोपाध्याय गोपाळाचार्यबावा कऱ्हाडकर यांचें पत्र श्रा० व० ७ शके १८१४.

" साष्टांग नमस्कार व आशीर्वाद यथायोग्य विशेष. वे. शा. सं. रामाचार्य बाबा गजेंद्रगडकर हे परलोकीं गेल्यापासून येथें विचार करण्यास साहाय्य कोणी नाहीं व वर्षीयस्त्वामुळें साहाय्यावांचून नीट विचार होत नाहीं. वे. शा. सं. सदाशिवशास्त्रीबोवा थत्ते यांकडे

पत्र पूर्वी पाठविलें त्याची नक्कल ठेविली नाहीं व त्यांत मजकूर जो लिहिला तो सर्व ध्यानांत नाहीं अथापि जितकें स्मरण आहे तितकें लिहितों त्यांत कांहीं फेर पडल्यास उपाय नाहीं. यथादृष्ट यथामति जें मी लिहितों त्याचा विचार तत्रत्य पंडितांनीं करून योग्यांश स्वीकारावा अयोग्यांशाची व्यवस्था धान्यपलालन्यायानें करावी.

१ प्रायश्चित्तमयूखे । राजा, राजपुत्र, बहुश्रत ब्राह्मण यांस क्षौराचा विकल्प । अन्यास क्षौराचा विकल्प नाहीं. या अभिप्रायाचा ग्रंथ आहे. बहुश्रुत ब्राह्मणाचें लक्षण व्यवहार मिताक्षरेंत गौतमस्मृतीचें वचन आहे त्यांत स्पष्ट आहे. अष्टाचत्वारिंशत्संस्कारैः संस्कृतः वेदवेदांगपारगः इत्यादि । होमविषये विकल्पस्तु, कोणीही लिहिला नाहीं. तीर्थी संस्कारलोपे शवदहनाधिकारसिध्यर्थ क्षौरहोमविष्णुश्राद्धादिपूर्वोगोत्तरांगांवांचून केवल कृच्छ्रप्रत्याम्नायदानरूप प्रायश्चित्ताचरण करतात ते अशक्तंमन्य होऊन करतात वचनमूलक नाहींसें वाटतें.

१ काशी यात्रा करून जे आले त्यांनीं ही पुनः प्रायश्चित्त यथायोग्य केलें पाहिजे. कर्नाटक, तैलंग, द्रविड, बंगाली, अग्निहोत्री, मोठमोठे साहेब क्षौर करतात प्रायशः । त्यापेक्षां क्षौर करणें यांत मानहानी नाहीं. । आतां पूर्व पत्रांत लिहिलेला मजकूर लिहितो तो तेथील विद्वानांस व श्रीक्षेत्र काशी प्रभृतिस्थ विद्वानांस मान्य होईल तर तो मान्य करावा. त्यांस मान्य न होईल तर त्याचें कारण सप्रमाण कळविण्यांत यावें.

१ कोणी विद्वान् ह्मणतात केशशब्द मस्तकावर जे लोम त्याचाच वाचक । कचः केशः शिरोरुह इत्यमरकोशात् । केशश्मश्रु वपते इति श्रुतौ समाहारद्वंद्वकरणाच्च । अन्यथा सामान्यविशेषयोर्द्वंद्वनिषेधात् स न स्यात्। हृषेर्लोमसु वा केशेषु इति सूत्रवार्तिकस्थाकरग्रंथेभ्यश्च । के मस्तके शेते स केश इतिव्युत्पत्तेश्च । तथाच पुंमुखस्थश्मश्रुशब्दवाच्यलोम्नां केशशब्दवाच्यत्वं नास्ति असें स्पष्ट सप्रमाण सिद्ध झालें । तेव्हां राजा वा राजपुत्रो वा ब्राह्मणो वा बहुश्रुतः । केशानां रक्षणार्थाय द्विगुणं व्रतमाचरेत् । विद्वद्विप्रनृपस्त्रीणां नेष्यते केशवापनं । इत्यत्रच मस्तकस्थकेशरक्षणार्थं द्विगुणं व्रतमुक्तं न तु श्मश्रुरक्षणार्थं । तथाच कृच्छ्रादिप्रायश्चित्ते श्मश्रुवपनं होमश्चावश्यकः ॥

बंगाली प्रांतांत मिशा काढून मस्तकाचे केश न काढणारे पुष्कळ लोक आहेत तत्पर तें वचन आहे असें त्यांचें मत त्याचा विचार पूर्ण करावा. सुज्ञास बहुत काय लिहिणें हे नमस्कार व आशीर्वाद."

---

नि० ७ आचार्य बुवांचें दुसरें पत्र.

मि० आश्वि० शु० १५ शके १८१४ नंदनेब्दे

"श्रीः ॥ मुखावरचे जे लोम ते केशशब्द वाच्य नाहींत। केश श्मश्रु वपत इति द्वंद्वनिर्देशात् । सामान्यविशेषयोर्द्वंद्वायोगात् । कचः केशः शिरोरुहः । श्मश्रुपुंमुखे इत्यमराच्च । केशानां रक्षणार्थाय नेष्यते केशवापनं। इत्यादि विकल्पबोधकवाक्ये तु केशशब्दः श्रूयते न श्मश्रुशब्दः । तस्मात् श्मश्रुवापनं विना प्रायश्चित्तं न भवति इत्यादि पूर्वपत्री लिहिलें होतें त्याचा विचार वे.शा.सं. सदाशिवशास्त्री थत्त प्रभृतींनीं काय केला तो कळविण्यांत यावा । श्मश्रुवापनावांचून जीं प्रायश्चित्तें होतात तीं अंगहीन । संपूर्ण

**पापनाशक नाहींत** असें येथें ह्मणतात, याचें उत्तर पाहिजे. अविद्वानाला क्षौरविकल्पप्रतिपादक आर्षवचन आहे कीं नाहीं। **पौरुषपंक्ति मान्य नाहीं** असें ह्मणतात।"

नि० ८ वे० शा० सं० सुब्रह्मण्यशास्त्री श्रीशृंगेरीमठ सर्वाधिकारी यांचा अभिप्राय

" श्रीमद्यजनादिषट्कर्मनिरतसनातनवैदिकधर्मानुसारिचतुःशाखीयब्रह्मवृंदसभां प्रति पुण्यपत्तनस्थितां शृंगेरीमठस्थश्रीजगद्गुरुस्वामिनां मठस्य धर्माधिकारिसुब्रह्मण्यशास्त्रिकृतनतयः। अत्र पुण्यग्रामे केचन ब्राह्मणा हूणानां गृहं गत्वा चांडालस्पृष्टं चहापानं बिस्कीटभक्षणं च बुद्धिपूर्वकं कृतवंतः। एतद्विषये एतेषां प्रायश्चित्तमस्ति वा नवेत्येकः प्रश्नः॥ अस्योत्तरम्। बुद्धिपूर्वकं सकृदपि कृतं चेत्प्रायश्चित्तं नास्तीति मे भाति। अबुद्धिपूर्वकं चेत्पटगर्भप्रायश्चित्तपूर्वकं **पुनरुपनयनं** कृत्वा पूता भवेयुरितिभाति वा॥

अत्र विषये शास्त्रोक्तरीत्या प्रायश्चित्तं न जातं प्रायश्चित्तिनोपि वयं प्रायश्चित्तं न कृतवंत इति पत्रिकाद्वारा प्रकटितवंतः॥ संकेश्वरमठस्थाः प्रायश्चित्तं कुर्वंत्वित्युत्तरं दत्तवंतो वयमतो हूण हे मोक्तभिर्व्यवहारकर्तॄणां प्रायश्चित्तं नास्तीति वदंति॥ तेषां प्रायश्चित्तमस्ति न वेति संदेहः (संसर्गिणांप्रायश्चित्तं नास्त्विति) देवैरुक्तमपि प्रायश्चित्तिनां सुसंव्यवहारकर्तॄणां **प्रायश्चित्तमस्त्येव** संदेहो नास्ति॥ इति सुब्रह्मण्यशास्त्रिकृतनतयः॥ विजयनामसंवत्सरे भाद्रपद."

नि० ९ वे. शा. सं. बाळकृष्णाचार्य रड्डी वाईकर यांचें पत्र. ज्येष्ठ वद्य ३ शके १८१४.

" आपलें पत्र व वर्तमानपत्रें आलीं तीं पावलीं मजकूर कळला. याचे पूर्वीच श्रीजगद्गुरु स्वामी यांजकडून प्रायश्चित्ताचे ठरावाचें बूक आह्माकडे येऊन पोंचलेंच आहे अस्तु.

१ जो प्रायश्चित्ती मनुष्य प्रायश्चित घेण्यास योग्य असून **अनुताप** झाल्यास त्यास जें शास्त्रांत प्रायश्चित्त सांगितलें असेल त्याचें विधिप्रमाणें प्रायश्चित्त जर करील तर त्याच्याशीं अन्नोदक व्यवहार करणेंस बाधक दिसत नाहीं.

१ "क्षौर प्रत्याम्नायानें होतें कां नाहीं" तर " राजा वा राजपुत्रो वा ब्राह्मणो वा बहुश्रुतः " इत्यादि वचनांत वाचनिक प्रत्याम्नाय अगर लोप जेथें सांगितले असतील तेथेंच होईल. **ऐच्छिक त्याचा अभाव करणें हें योग्य नाहीं.** सबब **प्रत्याम्नायानें** जें प्रायश्चित्त झालें तें **योग्य नाहीं** असें सिद्ध होतें. तर **साक्षात् क्षौर** करून ठरावाप्रमाणें प्रायश्चित्त करणें हें योग्य.

१ जो कोणी पाद्याचे घरांतील चहा वगैरे स्वीकार करून त्यास बहिष्कृत केलें असतां त्यांस सभ्यांनीं प्रायश्चित्त ठरविण्याचेपूर्वीं त्यांनीं दोन कृच्छ्रे प्रायश्चित्तें व काशीयात्रांग क्षौर केलें त्यांनीं ठरावाप्रमाणें **प्रायश्चित्त केलें पाहिजे.** कारण **यात्रेच्या निमित्तानें झालेलें क्षौर या प्रायश्चित्तास लागू नाहीं** व त्यास कोणतेही कर्माचा अधिकार नसल्यानें त्यानें यात्रा करणेंच वगैर नाहीं."

नि० १० वे० शा० सं० नरसिंह दीक्षि-

त हुशिंग श्री. पंतसचिव संस्थान भोर यांचे आश्रित. यांचें पत्र. आषा० शु० १ श० १८१४.

" १ श्री जगद्गुरु यांचे अधिकारी यांनीं ठरविलेलीं प्रायश्चित्तें क्षौरपूर्वक पूर्वोत्तरांगहोमादिविधिसहित सर्वप्रायश्चित्त करून नंतर चांद्रायणादि मुख्य व्रतें केलीं पाहिजेत. शरीरानें असमर्थ असतील तर द्रव्यप्रत्याम्नायानें आपले शक्तीप्रमाणें करावींत. तशीं न होतील तर चांद्रायणादिकांचें फल ह्मणजे होणारी जी **शरीरशुद्धि ती होणार नाहीं.** याकरितां **क्षौरपूर्वक सर्वप्रायश्चित्तादि** केलीं पाहिजेत.

**१ क्षौराचा प्रत्याम्नाय नाहीं.** प्रत्याम्नाय ह्मणजे कृच्छ्रादि मख्य व्रतें सांगितलीं तीं करण्याविषयीं शरीरानें असमर्थ असेल त्यांनीं द्रव्यादिकाचे प्रत्याम्नाय करावे असें सांगितलें. राजादिकांस महापापव्यतिरिक्त पापाचे ठिकाणीं केशसंरक्षणाकरितां ह्मणजे क्षौर न करितां **द्विगुणित व्रत** करावें असें सांगितलें तो **प्रत्याम्नाय नव्हे.** प्रत्याम्नाय ह्मणणाऱ्यांचें लक्ष्य तत्स्वरूपाकडे पुरलें नाहींसें वाटतें. प्रत्याम्नाय म्हणून जरी घेतील तरी क्षौराबद्दल दुप्पट व्रत करण्याविषयीं जें राजादिकांस सांगितलें व विद्वद्विप्र असेंही आहे त्यावरून सद्विद्या असोन विहित धर्मानें वागणारे पाहिजेत. राजादिकांचे परिगणनेंत इतरांचा समावेश होत नसल्यामुळें त्यांना प्रत्यक्षच क्षौर केलें पाहिजे.

समजून अगर न समजून पाद्याच्या घरचा चहा बिस्कीट खाणारे मंडळीस **पश्चात्ताप** झाल्यावांचून **प्रायश्चित्ताधिकार नाहीं.** पश्चात्ताप ह्मणजे आपले हातून वाईट कर्म झाल्यानंतर–हें मीं फार वाईट केलें पुनः असें करणार नाहीं–असा निग्रह करून केलेले पापापासून माझी मुक्तता कशी होईल **अशी तळमळ करणारा** तो प्रायश्चित्ताधिकारी होतो. नंतर त्यानें सभ्यांपुढें जाऊन त्यांजपुढें पापानुसारें द्रव्य ठेवून केलेले **पापाचा उच्चार** करून कळवावें. नंतर सभ्यांनीं त्याचें भाषण ऐकून विचार करून त्यास **यथार्थ जें प्रायश्चित्त** असेल तें सांगावें. तें करण्याविषयीं शरीरानें असमर्थ असेल तर करणाराची शक्ति पाहून द्रव्यादि प्रत्याम्नाय सांगावे. 'त्याप्रमाणें त्यांनीं करावे म्हणजे त्यांजबरोबर अन्नादि व्यवहार करण्यास हरकत नाहीं. परंतु एकंदर विचार करितां तसें न झाल्यामुळें **त्यांजबरोबर अन्नादि व्यवहार होणार नाहीं.**

१ क्षौर हें प्रायश्चित्तांग मुख्य आहे. तें केल्यावांचून होमादि विधि होत नाहीं. याकरितां **क्षौरावांचून केलेलीं प्रायश्चित्तें पुनः केलीं पाहिजेत.**

१ पाद्याचे घरचा चहा घेणाऱ्यानें अधिकारी यांनीं ग्रामण्याबद्दल ठराव करण्यापूर्वी काशीस जाऊन केलेलें **यात्रांगभूत प्रायश्चित्त व २ कृच्छ्रांचे प्रत्याम्नाय उपयोगीं पडणार नाहींत.** कारण **प्रायश्चित्त** करणें तें **सभ्योपदिष्ट झाल्यावांचून होत नाहीं.** मग सभ्योपदिष्ट यात्रा असेल तर घरीं संकल्प करून विधीप्रमाणें केलीं पाहिजेत. कृच्छ्रप्रत्याम्नाय जरी करणें असतील तरी तशींच पाहिजेत. तसें न झाल्यामुळें अधिकारी यांनीं ठरविलेलीं **प्रायश्चित्तें पुनः केलीं पाहिजेत.**

( नि. ११ आषा. शु. ११ श. १८१४ वे. शा. सं. अनंताचार्य गजेंद्रगडकर यांचें पत्र. )

" आपण लिहिलें पत्रांतील प्रश्नासंबंधानें पूर्वी वे. रा. रा. बिंदुमाधव शास्त्री निजबत श्री ६ जगद्गुरु यांचेकडून मत्र आलें होतें व त्यांतही आपण पाठविल्या प्रश्नासारखेच प्रश्न आहेत. सबब सदर शास्त्री बुवांस आह्मी जें येथें सभा करून उत्तर पाठविलें त्या उत्तराची व शास्त्री मजकूर यांजकडून आलेले पत्राची नक्कल ह्या सोबत पाठविली आहे त्यावरून आपले प्रश्नाचें उत्तर निराळें देण्याचें कारण नाहीं असें येथें सर्वांचे विचारास आलें आहे. "

( सदर्हू पत्र नि० १४ यास दाखल आहे. सबब येथें दिलें नाहीं. तें निशाण पहाणें. )

---

अधिकारी यांनीं—पुणें मुक्कामीं चौकशी चालली असतांना " १ पाद्र्याचे घरीं जाऊन पाद्र्यांनीं स्पृष्ट अगर त्यांचा पाचक ( बवरजी ) याजकडून करविलेला चहा ब्राह्मणानें ज्ञानतः त्यांचे भिडेमुळें अगर स्वेच्छेनें प्राशन केल्यास प्रायश्चित्त काय? २ पाद्र्यांचे घरीं जाऊन त्यांनीं दिलेलीं बिस्किटें ज्ञानतः भिडेमुळें अगर स्वेच्छेनें भक्षण करणारे ब्राह्मणास प्रायश्चित्त काय ? " अशा मतलबाचे दोन प्रश्न करून विद्वान मंडळीचे मागविलें अभिप्राय चौकशीचे कामीं नि. १७६ ते १८४ पावेतों दाखल केले त्यांची—श्री. बापुसाहेबांनीं आपल्या अभिप्रायांत लिहिल्याप्रमाणें—अद्याप आवश्यकता असल्यामुळें व अधिकारी यांनीं आपल्या ठरावांत "बलाबलाधिकरणन्याया" करितां सदर अभिप्रायांचा कसा उपयोग केला आहे, शुद्धिपत्रांत नमूद असलेलीं प्रायश्चित्तें झालीं असें प्रदिवादीचें ह्मणणें धरून चालल्यास तीं किती शास्त्रविरुद्ध आहेत आणि साहेबलोकांचा चहा वगैरे सेवन केल्यास किती दोष येतो ह्या सर्व गोष्टींचा खुलासा त्यांवरून होत असल्यामुळें ते अभिप्राय या खालीं निशाणें १२ ते २० यांत दाखल केले आहेत.

नि० १२ कज्यांतील नि० १७६ मिति फा. व. ११ श. १८१३ ( वे. शा. सं. हरिशास्त्री भट इंदुरकर यांचा अभिप्राय. )

"१ उत्तरः—अंगिराः सर्वांत्यजानां गमने भोजने संप्रमापणे। पराकेण विशुद्धिः स्यादित्यांगिरसभाषितम् । अत्र विज्ञानेश्वरः तत्र कामतः सूतादिवधे (संप्रमापणे) चांद्रायणं अकामतस्तु सूतादिवधे पराकः । यावाक्यावरून कामतः संप्रमापणास जें प्रायश्चित्त तेंच कामतः भोजनास प्रायश्चित्त आलें. कारण, अंगिराच्या वाक्यामध्यें भोजन व संप्रमापण यांचें साहचर्य आहे. तेव्हां अवकृष्टवधप्रकरणीं विज्ञानेश्वरांनीं संप्रमापणाबद्दल जें प्रायश्चित्त सांगितलें त्याचप्रमाणें भोजनास सांगितलें पाहिजे. ह्मणजे वाक्याची संगति राहील. ' सर्वांत्यज ' यामध्यें साहेबांचा समावेश होतो.

याला आधार. " आपो वा अशितमनशितं " ही श्रुति आहे. तीवरून भोजन शब्द ते पर्याय आहे तर या चहा पिणारास **चांद्रायण** प्रायश्चित्त ठरतें.

२ उत्तरः—भोजनशब्द लोकप्रसिद्धीनें भक्ष्य पदार्थावर असल्यामुळें याबद्दल पूर्वोक्त चांद्रायण प्रायश्चित्त आहेच. त्यांत कुक्कुटांड असल्यामुळें मनुः " क्रव्याद्विट्सूकरोष्ट्राणां कुक्कुटानां च भक्षणे । नरकाकखरोष्ट्राणां तप्तकृच्छ्रं विशोधनम्. " या स्मृतीवरून तप्तकृच्छ्रसमुचित चांद्रायण, बिस्किटें खाणारास प्रायश्चित्त आहे. हूणजा-

तींत उच्छिष्ट व अनुच्छिष्ट हा भेद मुळींच नाहीं तर संभावित उच्छिष्टभोजन प्रायश्चित्त देणें भाग आहे. अंगिराः चांडालपतितादीनामुच्छिष्टान्नस्य भोजने । चांद्रायणं चरेद्विप्रः क्षत्रः सांतपनं चरेत् या वाक्यावरून व विहितं यदकामानां कामात्तु द्विगुणं चरेत् । या वाक्यावरून **दोन चांद्रायणें** असावींत. बाकीं सर्व विचार पूर्वोक्त लिहिलाच आहे.

आमच्या येथील संस्कृत कालेजचे प्रोफेसर परशराम नारायण पाटणकर यांनीं आमचे द्वारें आपणांस कळविण्यास सांगितल्यावरून आह्मी कळवितों कीं त्यांनीं सदर ठिकाणीं चहा बिस्कीटाचें ग्रहण केलें नाहीं त्यांच्यावर फिर्यादींनीं केलेला आरोप खोटा आहे.

ताजाकलम—याच आधारानें प्रायश्चित्तेंदुशेखरामध्यें चांडालादिहस्तपाचितभोजने कार्यं चांद्रं च तद्धस्तेन भोजने द्विगुणं वगैरे लिहिलें आहे."

---

नि० १३ कज्यांतील नि० १७७ मिति चै० शु० १३ श० १८१४.

( वे० शा० सं० १ बाळकृष्णाचार्य रड्डी २ धरणीधर दीक्षित पाठक. ३ सिद्धेश्वर शास्त्री जोशी. ४ गणेशशास्त्री सोहनी. ५ वामनशास्त्री बापट. ६ बाळशास्त्री साळवेकर. ७ बाळकृष्ण दीक्षित थिटे. ८ विष्णुशास्त्री करंदीकर. ९ भास्करशास्त्री पावगी आणि १० गोपाळशास्त्री व्यास या वाईकर विद्वानांचा अभिप्राय. )

"१ उत्तरः—चांडालादिजलपाने आपस्तंबः । चांडालघटभांडस्थं नरः कामाज्जलं पिबेत् । प्रायश्चित्तं कथं तत्र वर्णे वर्णे विनिर्दिशेत् ॥ चरेत्सांतपनं विप्रः प्राजापत्येन भूमिपः । तदर्धं च चरेद्वैश्यः शूद्रे पादं विनिर्दिशेत् ॥

१ चांडालघटसंस्थं तु यत्तोयं पिबति द्विजः । तत्क्षणात्क्षिपते यस्तु प्राजापत्यं समाचरेत् ॥ यदि न क्षिपते तोयं शरीरे यस्य जीर्यति । **प्राजापत्यं** तु दातव्यं कृच्छ्रं **सांतपनं** तथा ॥ पाराशरः ॥

२ उत्तर प्रायश्चित्तेंदुशेखरे

म्लेच्छचांडालादिहस्तपाचितभोजने कार्यं चांद्रं पुनःसंस्कारश्च ॥ चांडालान्नं द्विजो भुक्त्वा सम्यक्चांद्रायणं चरेत् । बुद्धिपूर्वं तु **कृच्छ्राब्दं पुनःसंस्कार**मेव च इति यमः ॥

अंत्यावसायिनामन्नमश्नीयाद्यश्च कामतः । स तु **चांद्रायणं कुर्यात्तप्तकृच्छ्र**मथापि वा ॥ अंगिराः ॥

क्रव्यादसूकरोष्ट्राणां कुक्कुटानां च भक्षणे नरकाकखराश्वानां **तप्तकृच्छ्रं** विशोधनम् ॥ द्योतः ॥

या एकंदरीवरून म्लेच्छ अंत्यजादिकाचें पान, अन्न, कुक्कुटांड सुक्रत् भक्षण करणाऱ्या ब्राह्मणास **वपनसहित सांतपन, कृच्छ्राब्द, तप्तकृच्छ्र,** पुनःसंस्कार असावा असें येथील मंडळीचा विचार झाल्याप्रमाणें लिहिलें आहे."

---

नि० १४ कज्यांतील नि० १७८ मिति चै. शु. ११ शके १८१४.

( वे. शा. सं. १ अनंताचार्य गजेंद्रगडकर. २ अनंत दीक्षित जोशी. ३ भाऊ दीक्षित जोशी. ४ केशवभट झिंग्रे अग्निहोत्री. ५ दाजी शास्त्री काळे. ६ वामनभट बहुलेकर. ७ निळंभटजी धांदरफळे. ८ रामचंद्र जोशी संगमेश्वरकर. ९ विनायक पाध्ये.

१० विनायक जोशी मोघे. ११ नारायण शास्त्री पंडित. १२ बाबाशास्त्री काशीकर. १३ नारायणबोवा द्रविड. १४ विनायकबोवा द्रविड व १५ शंकरशास्त्री माटे या सातारकर विद्वानांचा अभिप्राय. )

"१ उत्तर—पराशरः चरेत्सांतपनं विप्रः प्राजापत्यमनंतरः । तदर्धं तु चरेद्वैश्यः पादं शूद्रस्य दापयेत् ॥ प्रायश्चित्तेंदुशेखरे । चांडालादिभांडसंस्पृष्टांबुपाने गोमूत्रयावकं त्रिरात्रं **पुनःसंस्कारश्च** ॥

२ उत्तर—बिस्किटें हीं गोधूम व कुक्कुटांड मिश्रित किंवा केवळ गोधूमपिष्ट मिश्रित अन्न होय. यास प्रायश्चित्त.

अंगिराः । अंत्यावसायिनामन्नमश्नीयाद्यश्च कामतः । स तु **चांद्रायणं** कुर्यात्तप्तकृच्छ्रमथापि वा ॥ प्रायश्चित्तेंदुशेखरे । चांडालादिपक्वान्नाशने सर्वत्र पुनरुपनयनम् । यवनम्लेच्छान्नभोजनेप्येवम् ॥ मनुः । क्रव्यादसूकरोष्ट्राणां कुक्कुटानां च भक्षणे । नरकाकखराणां च **तप्तकृच्छ्रं** विशोधनम् ॥

ज्या बिस्किटांत कुक्कुटांड नाहीं त्या बिस्किटाचें भक्षण करणारास वर लिहिलेले प्रायश्चित्तांपैकीं मनुस्मृतींत सांगितलेलें प्रायश्चित्त खेरीज करून बाकीचें म्हणजे अंगिरा व प्रायश्चित्तेंदुशेखर यांतील प्रायश्चित्त समजावें.

सदहू प्रायश्चित्त करणें तें **क्षौरपूर्वक** केलें पाहिजे. कारण, मिताक्षरायां वसिष्ठः 'कृच्छ्राणां व्रतरूपाणां श्मश्रुकेशानि दापयेत् । अक्षिरोमशिखावर्जम्'

यावरून वर सांगितलेलें प्रायश्चित्त **क्षौरपूर्वकच** केलें पाहिजे असें येथें आमचे विचारास येतें."

---

नि० १५ कज्यांतील नि० १७९ मिति चै० शु० १३ श० १८१४ (वे० शा० सं० रामशास्त्री गोडबोले माहुलीकर यांचा अभिप्राय. )

" शूद्रान्नं सूतकान्नं च अभोज्यस्यान्नमेव च । शंकितं प्रतिषिद्धान्नं शूद्रोच्छिष्टं तथैवच ॥ यदि भुक्तं तु विप्रेण अज्ञानादापदापि वा । ज्ञात्वा समाचरेत्कृच्छ्रं ब्रह्मकूर्चं तु पावनं ॥

भांडस्थमंत्यजानां तु जलं वा यः पिबेद्विजः । ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चैव प्रमादतः । ब्रह्मकूर्चोपवासेन द्विजातीनां तु निष्कृतिः इति पराशरवचनद्वयम् ।

मदांधम्लेच्छभांडेभ्यो यस्त्वपः पिबते द्विजः । कृच्छ्रपादेन शुध्येत पुनः संस्कारमर्हति अभ्यासतः इत्यापस्तंबः ॥

प्रथमवचनेन शूद्राद्यन्नभक्षणे ज्ञानतोऽज्ञानतो वा प्रायश्चित्तं ज्ञेयम् । द्वितीयवचनेन प्रमादादंत्यजजलपाने प्रायश्चित्तम् । अभ्यासतस्तृतीयेन " ॥

---

नि. १६ कज्यांतील नि. १८० चै. व. १ शके १८१४ ( वे. शा. सं. अनंतशास्त्री गणेशवाडीकर श्रीजगद्गुरु मठकरवीर व संकेश्वर याचें मठांतील आश्रित यांचा अभिप्राय. )

" चालू कामांत, चांडालादिभांडस्थोदक ( ग्रहण ) केलें असतां जो दोष येईल तोच तुल्य न्यायानें येईल. यास प्रायश्चित्त स्मृत्यर्थसारांत लिहिलें आहे तें येणेंप्रमाणें. चांडालादिकूपेल्पजलाशये वांबुपीत्वा स्नात्वा तद्भांडस्थं वा मत्या वर्णाः महासांतपनं कार्यं तदर्धं पादं च क्रमेण क्रमाच्चरेयुः । अमत्या तदर्धं अशक्तः पंचगव्यं पिबेत् ॥ असें प्राय-

श्चित्त लिहिलें आहे यावरून ब्राह्मणानें मत्या चांडालभांडस्थोदक प्राशन केल्यास महा**सांतपन** कृच्छ्र प्रायश्चित्त युक्त वाटतें. चालू कामीं कांहीं वचनें प्रायश्चित्ताल्पत्वभ्रांतिजनक आहेत त्यांची व्यवस्था येणेंप्रमाणेंः—

१ पराशरः चांडालोदकभांडे तु अज्ञानात्पिबते जलम् । तत्क्षणात्क्षिपते यस्तु प्राजापत्यं समाचरेत् ॥ यदि न क्षिपते तोयं शरीरे यस्य जीर्यति । प्राजापत्यं न दातव्यं कृच्छ्रं सांतपनं चरेत् ॥ चरेत्**सांतपनं** विप्रः प्राजापत्यं तु भूमिपः ॥ असें आहे. परंतु ह्या वचनांतील सांतपन पद वरील स्मृत्यर्थसारावरून **महासांतपन**पर आहे.

२ चांडालकूपभांडेषु त्वज्ञानात्पिबते यदि । प्रायश्चित्तं कथं तेषां वर्णे वर्णे विधीयते ॥ चरेत्**सांतपनं** विप्रः प्राजापत्यं तु भूमिपः ह्या वचनाची व्यवस्था वरीलप्रमाणेंच आहे.

३ चंडालपतितादीनां तोयं यस्तु पिबेन्नरः। पराकं कामतः कुर्याद्ब्रह्मकूर्चमकामतः॥ ह्या वचनांत चांडालादितोयप्राशनाचेंच प्रायश्चित्त लिहिलें तेन मदुक्तप्रायश्चित्तबाध होईलसें वाटत नाहीं.

४ यस्तु चांडालभांडस्थमज्ञानादुदकं पिबेत् । स तु त्र्यहेण शुध्येत शूद्रस्त्वेकेन शुध्यति हें वचन अज्ञानतः चांडालभांडस्थजलप्राशनपर आहे.

५ आपत्काले तु विप्रेण भुक्तं शूद्रगृहे यदि । मनस्तापेन शुध्येत द्रुपदां वा शतं जपेत् ॥ श्वपाकचांडालपरिग्रहेषु पीत्वा जलं पंचगव्येन शुध्येत् हें वचनही प्रकृत दोषास पंचगव्यरूप प्रायश्चित्त येईल असें भ्रामक आहे. परंतु, आपद्विषयक असून वरील स्मृत्यर्थसारानुरोधेंकरून अशक्तासच लागू आहे.

६ शुक्तानि च कषायांश्च पीत्वा मेध्यानपि द्विजः । तावद्भवत्यप्रयतो यावत्तन्न व्रजत्यधः ॥ अशी मनुस्मृति आहे, परंतु वरील पदार्थ गुणदुष्टांमध्यें स्मृत्यर्थसार वगैरे ग्रंथांत धरिले आहेत. येवढ्यावरून सदर स्मृतींतील प्रायश्चित्त केवळ गुणदुष्टासच असावें असें मनूस अभिप्रेत आहे. चालू कामांत चांडालभांडस्थ चहास स्मृत्यर्थसारांतीलच प्रायश्चित्त युक्त होय ॥

चांडालादिहस्तपाचितभोजने प्रायश्चित्तमाह शेखरे । चांडालादिहस्तपाचितभोजने **कायं चांद्रं** च असें लिहिलें आहे. यावरून बिस्किटें खाल्लेस **शेखरोक्त** प्रायश्चित्त करावें असें वाटतें.

---

नि. १७ कज्यांतील नि. १८१ मिति चै० व० ४ श० १८१४ (वे० शा० सं० आत्मारामशास्त्री श्रीचे मठांतील आश्रित यांचा अभिप्राय. )

"१ उत्तरः—मदांधम्लेच्छभांडेभ्यो यस्त्वपः पिबते द्विजः । कृच्छ्रपादेन शुध्येत **पुनःसंस्कार**मर्हतीत्यापस्तंब वाक्यावरून पुनःसंस्कारपूर्वक पादकृच्छ्र करावें असें होतें. अथवा भांडस्थमंत्यजादीनां जलं वा यः पिबेद्द्विजः इत्यादि वचनावरून ब्रह्मकूर्चोपवास सांगितला तो अज्ञानपर आहे. बुद्धिपूर्वक झालें असतां आपस्तंबः चांडालकूपभांडस्थं नरः कामाज्जलं पिबेत् । प्रायश्चित्तं कथं तत्र वर्णे वर्णे विनिर्दिशेत् । **चरेत्सांतपनं** विप्रः प्राजापत्यमनंतरः । तदर्धं तु चरेद्वैश्यः शूद्रे पादं समाचरेत् या वचनेंकरून बुद्धिपूर्वक प्राशनास सांतपन उक्त आहे. यापेक्षां अल्पप्रायश्चित्तें अढळतील तीं संकटादिविषयक आहेत.

२ उत्तरः—अंगिराः अंत्यावसायिनामन्न-

मश्नीयाद्यश्च कामतः । स तु **चांद्रायणं** कुर्यात्तप्तकृच्छ्रमथापि वा ॥ कुक्कुटांडभक्षणे मनुः क्रव्यादसूकरोष्ट्राणां कुक्कुटानां च भक्षणे । नरकाकखराणां च तप्तकृच्छ्रं विशोधनम् । यावरून कुक्कुटांडमिश्र गोधूमान्न भक्षण केलेस चांद्रायण प्रायश्चित्त केलेस उक्त प्रायश्चित्त केलेस निष्कृति उक्त पातकाची होईल. कारण, बिस्किट हा पदार्थ उभयमिश्र असलेचा संभव असलेनें तप्तकृच्छ्रापेक्षया **चांद्रायण करणें न्याय्य** दिसतें. त्याप्रमाणें चहा व बिस्किटें दोघांचें सेवन झाल्यास **चांद्रायणानें** दोन्हींची सिद्धि होईल. तथा च शेखरे एकप्रायश्चित्तकनानापातककर्मणां तत्प्रायश्चित्तैकप्रयोगेणैव नाशः । एवमधिकपापनाशादुक्तेनैकवारमनुष्ठितेन न्यूननाशस्यापि पापांतरस्य नाश इति. केवळ चहाचें सेवन झालें असल्यास वरील प्रायश्चित्तानेंच सिद्धि होईल. "

---

नि १८. कज्यांतील नि० १८२ मि० चै० व० ६ श० १८१४ (वे० शा० सं० श्रीधरभटजी फाटक वेंगुर्लेकर श्रीचे मठांतील आश्रित यांचा अभिप्राय )

"आतां प्रायश्चित्त सांगणें हें धर्मशास्त्र ग्रंथ विचारपूर्वक सांगितलें असतां वक्ता निर्दोषी होतो. तथा च मयूखे पराशरः । अज्ञात्वा धर्मशास्त्राणि प्रायश्चित्तं ददाति यः। प्रायश्चित्ती भवेत्पूतः किल्बिषं परिषद्व्रजेत् ॥ प्रायश्चित्त सांगणें तें विचारपूर्वक **उक्त असेल तेंच** सांगावें **अनुग्रह करूं नये.** स्थलविशेषीं अनुग्रह करण्याची परवानगी आहे. तथा च पराशरः दुर्बलेऽनुग्रहः कार्यस्तथैव शिशुवृद्धयोः । अतोन्यथा भवेद्दोषस्तस्मान्नानुग्रही भवेत् ॥ देवलः । स्नेहाद्वा यदि वा लोभाद्भयादज्ञानतोपि वा । कुर्वंत्यनुग्रहं ये तु तत्पापं तेषु गच्छति । अनुग्रहो दया ॥ यासाठीं सशास्त्र उक्त असेल तें प्रायश्चित्त लिहितों.

प्रकृत चहा हा अन्न होईल किंवा उदक होईल असा संशय. जर कोणी हें द्रवद्रव्य असल्यानें उदक आहे असें ह्मणतील तर तें योग्य नाहीं. कारण हा पदार्थ अनेक पयःप्रभृति पदार्थांनीं युक्त असोन पक्व झाला आहे सबब **उदकत्व येणार नाहीं.** पुराणादि ग्रंथांत भक्ष्य, भोज्य, लेह्य, पेय असें चतुर्विध अन्न सांगितलें आहे. याचा **पेयांत अंतर्भाव करणें** योग्य आहे. भागवतेपि पच्यंतां विविधाः पाकाः सूपांताः पायसादयः ॥ यानें पायसास अन्नत्व सांगितलें आहे. घृतपक्वं तैलपक्वं या वाक्यांत केवलवह्निना पक्व पदार्थास फलत्व सांगितल्यानें **जलाग्निपक्व** पदार्थास **अन्नत्व** ध्वनित केलें आहे. याप्रमाणें शिष्टाचार चालू आहे. तस्मात् येथें **चांडालान्नभक्षणप्रयुक्तप्रायश्चित्त करणें न्याय्य दिसतें** तें मनूनें सांगितलें आहे. अध्याय १० गर्हितानाद्ययोर्जग्धिः सुरापानसमानि षट् । अत्र गर्हितमिति पदस्य **गर्हितं संसर्गदुष्टचांडालान्नादि** एवं सर्वज्ञनारायणेन व्याख्यानं कृतं ॥ तेव्हां चांडालान्न भक्षणास **सुरापानसमत्व** व्यक्त केल्यानें सुरापान प्रायश्चित्त करावें असें सिद्ध होतें. शंका—ननु सुरापानसमानीत्युक्त्या राजसमो मंत्रीत्यादौ किंचिद्धीन एव समशब्दप्रयोगादत्रापि न्यूनं प्रायश्चित्तं कल्पनीयमिति चेन्न । अत्र समाधानम् ॥ इषावैकाहे समानमितरातितिथेनेति (१) वाचनिकातिदेशे न्यूनत्वाप्रतीतेर्नन्यूनतेति मयूखे ॥ किं च यदि चांडालादिभक्षणस्य सुरापानन्यूनत्वं मनोरिष्टं स्याच्चेत्तदा चांडालांत्यस्त्रियो गत्वा

श्चित्त लिहिलें आहे यावरून ब्राह्मणानें मत्या चांडालभांडस्थोदक प्राशन केल्यास **महासांतपन** कृच्छ्र प्रायश्चित्त युक्त वाटतें. चालू कामीं कांहीं वचनें प्रायश्चित्तालपत्वभ्रांतिजनक आहेत त्यांची व्यवस्था येणेंप्रमाणेः—

१ पराशरः चांडालोदकभांडे तु अज्ञानात्पिबते जलम् । तत्क्षणात्क्षिपते यस्तु प्राजापत्यं समाचरेत् ॥ यदि न क्षिपते तोयं शरीरे यस्य जीर्यति । प्राजापत्यं न दातव्यं कृच्छ्रं सांतपनं चरेत् ॥ **चरेत्सांतपनं** विप्रः प्राजापत्यं तु भूमिपः ॥ असें आहे. परंतु ह्या वचनांतील सांतपन पद वरील स्मृत्यर्थसारावरून **महासांतपन**पर आहे.

२ चांडालकूपभांडेषु **त्वज्ञानात्**पिबते यदि । प्रायश्चित्तं कथं तेषां वर्णे वर्णे विधीयते ॥ **चरेत्सांतपनं** विप्रः प्राजापत्यं तु भूमिपः ह्या वचनाची व्यवस्था वरीलप्रमाणेंच आहे.

३ चंडालपतितादीनां तोयं यस्तु पिबेन्नरः। पराकं कामतः कुर्याद्ब्रह्मकूर्चमकामतः॥ ह्या वचनांत चांडालादितोयप्राशनाचेंच प्रायश्चित्त लिहिलें तेन मदुक्तप्रायाश्चित्तबाध होईलसें वाटत नाहीं.

४ यस्तु चांडालभांडस्थमज्ञानादुदकं पिबेत् । स तु त्र्यहेण शुध्येत शूद्रस्त्वेकेन शुध्यति हें वचन अज्ञानतः चांडालभांडस्थजलप्राशनपर आहे.

५ आपत्काले तु विप्रेण भुक्तं शूद्रगृहे यदि । मनस्तापेन शुध्येत द्रुपदां वा शतं जपेत् ॥ श्वपाकचांडालपरिग्रहेषु पीत्वा जलं पंचगव्येन शुध्येत् हें वचनही प्रकृत दोषास पंचगव्यरूप प्रायश्चित्त येईल असें भ्रामक आहे. परंतु, आपद्विषयक असून वरील स्मृत्यर्थसारानुरोधेंकरून अशक्तासच लागू आहे.

६ शुक्तानि च कषायांश्च पीत्वा मेध्यानपि द्विजः । तावद्भवत्यप्रयतो यावत्तन्न व्रजत्यधः ॥ अशी मनुस्मृति आहे, परंतु वरील पदार्थ गुणदुष्टांमध्यें स्मृत्यर्थसार वगैरे ग्रंथांत धरिले आहेत. येवढ्यावरून सदर स्मृतींतील प्रायश्चित्त केवळ गुणदुष्टासच असावें असें मनूस अभिप्रेत आहे. चालू कामांत चांडालभांडस्थ चहास स्मृत्यर्थसारांतीलच प्रायश्चित्त युक्त होय ॥

चांडालादिहस्तपाचितभोजने प्रायश्चित्तमाह शेखरे। चांडालादिहस्तपाचितभोजने **कायं चांद्रं** च असें लिहिलें आहे. यावरून बिस्किटें खाल्लेस **शेखरोक्त** प्रायश्चित्त करावें असें वाटतें.

---

नि. १७ कज्यांतील नि. १८१ मिति चै० व० ४ श० १८१४ (वे० शा० सं० आत्मारामशास्त्री श्रीचे मठांतील आश्रित यांचा अभिप्राय. )

"१ उत्तरः—मदांधम्लेच्छभांडेभ्यो यस्त्वपः पिबते द्विजः । कृच्छ्रपादेन शुध्येत **पुनःसंस्कार**मर्हतीत्यापस्तंब वाक्यावरून पुनःसंस्कारपूर्वक पादकृच्छ्र करावें असें होतें. अथवा भांडस्थमंत्यजादीनां जलं वा यः पिबेद्द्विजः इत्यादि वचनावरून ब्रह्मकूर्चोपवास सांगितला तो अज्ञानपर आहे. बुद्धिपूर्वक झालें असतां आपस्तंबः चांडालकूपभांडस्थं नरः कामाज्जलं पिबेत् । प्रायश्चित्तं कथं तत्र वर्णे वर्णे विनिर्दिशेत् । **चरेत्सांतपनं** विप्रः प्राजापत्यमनंतरः । तदर्धं तु चरेद्वैश्यः शूद्रे पादं समाचरेत् या वचनेंकरून बुद्धिपूर्वक प्राशनास सांतपन उक्त आहे. यापेक्षां अल्पप्रायश्चित्तें आढळतील तीं संकटादिविषयक आहेत.

२ उत्तरः—अंगिराः अंत्यावसायिनामन्न-

मश्नीयाद्यश्च कामतः । स तु **चांद्रायणं** कुर्यात्तप्तकृच्छ्रमथापि वा ॥ कुकुटांडभक्षणे मनुः क्रव्यादसूकरोष्ट्राणां कुक्कुटानां च भक्षणे । नरकाकखराणां च तप्तकृच्छ्रं विशोधनम् । यावरून कुक्कुटांडमिश्र गोधूमान्न भक्षण केलेस चांद्रायण प्रायश्चित्त केलेस उक्त प्रायश्रित्त केलेस निष्कृति उक्त पातकाची होईल. कारण, बिस्किट हा पदार्थ उभयमिश्र असलेचा संभव असलेनें तप्तकृच्छ्रापेक्षया **चांद्रायण करणें न्याय्य** दिसतें. त्याप्रमाणें चहा व बिस्किटें दोघांचें सेवन झाल्यास **चांद्रायणानें** दोन्हींची सिद्धि होईल. तथा च शेखरे एकप्रायश्चित्तकनानापातककर्मणां तत्प्रायश्चित्तैकप्रयोगेणैव नाशः । एवमधिकपापनाशाद्युक्तेनैकवारमनुष्ठितेन न्यूननाशस्यापि पापांतरस्य नाश इति. केवळ चहाचें सेवन झालें असल्यास वरील प्रायश्चित्तानेंच सिद्धि होईल. ”

---

नि १८. कज्यांतील नि० १८२ मि० चै० व० ६ श० १८१४ (वे० शा० सं० श्रीधरभटजी फाटक वेंगुर्लेकर श्रीचे मठांतील आश्रित यांचा अभिप्राय )

“आतां प्रायश्चित्त सांगणें हें धर्मशास्त्र ग्रंथ विचारपूर्वक सांगितलें असतां वक्ता निर्दोषी होतो. तथा च मयूखे पराशरः । अज्ञात्वा धर्मशास्त्राणि प्रायश्चित्तं ददाति यः। प्रायश्चित्ती भवेत्पूतः किल्बिषं परिषद्व्रजेत् ॥ प्रायश्चित्त सांगणें तें विचारपूर्वक **उक्त असेल तेंच** सांगावें **अनुग्रह करूं नये.** स्थलविशेषीं अनुग्रह करण्याची परवानगी आहे. तथा च पराशरः दुर्बलेऽनुग्रहः कार्यस्तथैव शिशुवृद्धयोः । अतोन्यथा भवेद्दोषस्तस्मान्नानुग्रही भवेत् ॥ देवलः । स्नेहाद्वा यदि वा लोभाद्भयादज्ञानतोपि वा । कुर्वंत्यनुग्रहं ये तु तत्पापं तेषु गच्छति । अनुग्रहो दया ॥ यासाठीं सशास्त्र उक्त असेल तें प्रायश्चित्त लिहितों.

प्रकृत चहा हा अन्न होईल किंवा उदक होईल असा संशय. जर कोणी हें द्रवद्रव्य असल्यानें उदक आहे असें ह्मणतील तर तें योग्य नाहीं. कारण हा पदार्थ अनेक पयःप्रभृति पदार्थांनीं युक्त असोन पक्व झाला आहे सबब **उदकत्व येणार नाहीं.** पुराणादि ग्रंथांत भक्ष्य, भोज्य, लेह्य, पेय असें चतुर्विध अन्न सांगितलें आहे. याचा **पेयांत अंतर्भाव करणें** योग्य आहे. भागवतेपि पच्यंतां विविधाः पाकाः सूपांताः पायसादयः ॥ यानें पायसास अन्नत्व सांगितलें आहे. घृतपक्वं तैलपक्वं या वाक्यांत केवलवह्निना पक्व पदार्थास फलत्व सांगितल्यानें **जलाग्निपक्व** पदार्थास **अन्नत्व** ध्वनित केलें आहे. याप्रमाणें शिष्टाचार चालू आहे. तस्मात् येथें **चांडालान्नभक्षणप्रयुक्तप्रायश्चित्त करणें न्याय्य दिसतें** तें मनूनें सांगितलें आहे. अध्याय १० गर्हितानाद्ययोर्जग्धिः सुरापानसमानि षट् । अत्र गर्हितमिति पदस्य **गर्हितं संसर्गदुष्टचांडालान्नादि** एवं सर्वज्ञनारायणेन व्याख्यानं कृतं ॥ तेव्हां चांडालान्न भक्षणास **सुरापानसमत्व** व्यक्त केल्यानें सुरापान प्रायश्चित्त करावें असें सिद्ध होतें. शंका—ननु सुरापानसमानीत्युक्त्या राजसमो मंत्रीत्यादौ किंचिद्धीन एव समशब्दप्रयोगादत्रापि न्यूनं प्रायश्चित्तं कल्पनीयमिति चेन्न । अत्र समाधानम् ॥ इषावैकाहे समानमितरातितिथेनेति (१) वाचनिकातिदेशे न्यूनत्वाप्रतीतेर्नन्यूनतेति मयूखे ॥ किंच यदि चांडालादिभक्षणस्य सुरापानन्यूनत्वं मनोरिष्टं स्याच्चेत्तदा चांडालांत्यस्त्रियो गत्वा

भुक्त्वा च प्रतिगृह्य च । पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छतीत्यनेन पुनः पातित्यविधानमनुपपन्नं स्यात् । तथा च दोषातिशयबोधनार्थमेवैतत्पुनरुक्तं स्यात् । अन्यथा गर्हितपदेनैव सिद्धेः । तस्माच्चांडालान्नभक्षणेन पुनरुक्त्या पातित्यं दृढीकृतं । येथें सुरापानप्रयुक्त प्रायश्चित्त करावें असें सिद्ध झालें. मन्वर्थविपरीता तु या स्मृतिः सा विनश्यति या न्यायानें एतद्विरुद्ध अब्दादिप्रायश्चित्तविधायक स्मृतिवचनें असतील तीं प्राणांतिकादि आपद्विषयत्वेंकरून व्यवस्था करणें योग्य दिसतें. आतां हें उदकच आहे असा आग्रह करतील तर त्यास. सर्वज्ञ नारायणांनीं गर्हितपदाचा संसर्गदुष्टचांडालान्नादि असा अर्थ केला आहे तेव्हां **आदिपदानें उदक घेणें** हें युक्तिमत् आहे. कारण मनूनें चांडालोदकपानप्रयुक्त प्रायश्चित्त पृथक् सांगितलें नाहीं तेव्हां त्यास गर्हितपदानें उदकही विवक्षित आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सदरील प्रायश्चित्त **क्षौरपूर्वक** केलें पाहिजे. तथा च मयूखे वसिष्ठः । कृच्छ्राणां व्रतरूपाणां श्मश्रुकेशादि वापयेत् । अक्षिलोमशिखावर्जमिति । राजतत्पुत्रबहुश्रुतविप्राणामिच्छया वपनाभावस्तदा च द्विगुणं व्रतं द्विगुणा च दक्षिणा देया । पूर्वोक्त राजादि त्रिकांत दोषी परिगणित नसल्यास पूर्वोक्त प्रायश्चित्त **क्षौरपूर्वकच करणें** भाग पडेल.

किंच पूर्वी पुनर्विवाहखंडनसंबंधीं एक बुक छापलेलें मीं वाचून पाहिलें त्यांत श्रीशंकराचार्य स्वामी जगद्गुरु यांची स्वारी पुणें मुक्कामीं गेलीं असून तेथें एतद्देशीय व काश्या दिक्षेत्रस्थ विद्वज्जनांचा समाज जमला असून त्या प्रसंगीं कृष्णशास्त्री चिपळोणकर यांजवर साहेब लोकांचें घरीं **अभक्ष्य भक्षण केल्याबद्दल आरोप** आला होता त्याबद्दल श्रीनीं सर्व विद्वज्जनानुमतें **सक्षौरद्वादशाब्द ब्रह्मदंडसहित** प्रायश्चित्त दिल्याचें छापलें आहे तें मद्गुपन्यस्तमनुस्मृतिमूलकच आहे असें वाटतें. तें **सशास्त्र** आहे. करितां शास्त्रानें व सदाचारानें प्रकृत प्रसंगीं **हेंच प्रायश्चित्त योग्य वाटलें.** बिस्किट भक्षणाचें प्रायश्चित्तही वरील प्रायश्चित्ताप्रमाणेंच आहे करितां त्यानें याची प्रसंगसिद्धि होईल इत्यलं पल्लवितेंन."

---

नि. १९, कज्यांतील नि. १८३ मि. चै. व० ६ श० १८१४ ( वे० शा० सं० १ सदाशिवशास्त्री थत्ते. २ नरसिंहशास्त्री शेजवलकर. ३ वासुदेवशास्त्री देडगांवकर. ४ वासुदेवशास्त्री अभ्यंकर. ५ गणेशशास्त्री देडगांवकर. ६ दामोदरशास्त्री साठे. ७ चिंतामणशास्त्री. ८ महादेवशास्त्री बोपर्डीकर ९ वामनशास्त्री. १० वामनाचार्य झळकीकर. ११ काशिनाथभट चितळे. १२ कृष्णंभट. १३ रामभट अपटे. १४ नारायणभट खेर. १५ रामभट गुणे. १६ रघुनाथभट डोंगरे. या विद्वानांचा अभिप्राय. )

अथ हूणादिस्पृष्टोदकान्नपानभक्षणविषये प्रायश्चित्तविचारः । तत्र हूणानां वचनेषु साक्षाज्जातिनिर्देशाभावाद्बहूनामेकधर्माणामेकस्यापि यदुच्यते । सर्वेषां तद्भवेत्कार्यमेकरूपा हि ते स्मृता इत्युशनःस्मृतेर्म्लेच्छादिभिर्हूणानां समधर्मत्वात्तद्विषयकनिर्दिष्टप्रायश्चित्तेन निर्वाहः ॥ तत्र म्लेच्छादिस्पृष्टजलपाने प्रायश्चित्तम् । मद्यांधम्लेच्छभांडेभ्यो यस्त्वपः पिबते द्विजः । कृच्छ्रपादेन शुध्येत **पुनःसंस्कार**मर्हति इत्यापस्तंबवाक्यात्कृच्छ्रपादेन **शुद्धिः**

पुनःसंस्कारश्च ॥ अंत्यजसमत्वेपि भांडस्थमंत्यजानां तु जलं वा यः पिबेद्द्विजः । ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चैव प्रमादतः । ब्रह्मकूर्चोपवासेन द्विजातीनां तु निष्कृतिरिति पराशरवचनाद्ब्रह्मकूर्चोपवासः ॥ एतदज्ञानतो वेदितव्यम् ॥ अत एवांगिराः अज्ञानात्पिबते तोयं ब्राह्मणस्त्वंत्यजातिषु । अहोरात्रोषितो भूत्वा पंचगव्येन शुध्यति ॥ ज्ञानतस्तु द्विगुणम् ॥ भांडस्थितमभोज्येषु जलं दधि घृतं पयः । अकामतस्तु यो भुंक्ते प्रायश्चित्तं कथं भवेत् ॥ ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा उपसर्पति । ब्रह्मकूर्चोपवासेन याज्यवर्णस्य निष्कृतिः ॥ शूद्राणां नोपवासः स्याच्छूद्रो दानेन शुध्यति । ब्रह्मकूर्चो(१)महोरात्रं श्वपाकमपि शोधयेदिति पराशरवचनम् ॥ अभोज्येषु अभोज्यान्नानां गृहेषु उपसर्पति परिषदमुपसर्पतीति माधवाचार्यैर्व्याख्यातम् ॥ चांडालसमत्वे तु उशनाः । चांडालेन च संस्पृष्टं पीत्वा वारि द्विजोत्तमः । त्रिरात्रेण विशुध्येत पंचगव्येन शुध्यति । एतदज्ञानतो ज्ञेयम् ॥ अत एव देवलः यस्तु चंडालभांडस्थमज्ञानादुदकं पिबेत् । स तु त्र्यहेण शुध्येत शूद्रस्त्वेकेन शुध्यति ॥ एतदेकवाक्यतया चंडालपरिगृहीतमज्ञानादुदकं पिबेत् । तस्य शुद्धिं विजानीयात्प्राजापत्येन नित्यश इत्यंगिरःस्मृतौ प्राजापत्यशब्देन लघुप्राजापत्यं याज्ञवल्क्योक्तं ग्राह्यम् ॥ अज्ञानतोभ्यासविषयं वैतद्वचनम् ॥ वृद्धहारीतः । चांडालकूपभांडस्थं मद्यभांडस्थमेव वा । पीत्वा समाचरेत्पादं कामतोर्धं समाचरेत् ॥ आपस्तंबः । चांडालकूपभांडस्थं नरः कामाज्जलं पिबेत् । प्रायश्चित्तं कथं तत्र वर्णे वर्णे विनिर्दिशेत् । चरेत्सांतपनं विप्रः प्राजापत्यमनंतरः । तदर्धं तु चरेद्वैश्यः शूद्रे पादं विनिर्दिशेदिति आभ्यां वचनाभ्यां कामतोजलपानेऽर्धकृच्छ्रं शंखोक्तसप्ताहसाध्यं सांतपनं वा ॥ अत्र पूर्वोक्तमदांधम्लेच्छभांडेभ्यइत्यापस्तंबवाक्ये पुनःसंस्कारसहिता कृच्छ्रपादेन शुद्धिर्विहिता साभ्यासविषयिणी बोध्या ॥ प्रायश्चित्तस्य गुरुत्वादिति भाति ॥ अन्नभक्षणे तु वसिष्ठः । चांडालान्नं भुक्त्वा त्रिरात्रमुपवसेत्सिद्धान्नं भुक्त्वा पराक इति । एतदज्ञानतः सकृद्भक्षणे बोध्यम् ॥ कामतस्त्वंगिराः अंत्यावसायिनामन्नमश्नीयाद्यस्तु कामतः । स तु चांद्रायणं कुर्यात्तप्तकृच्छ्रमथापि वा ॥ अत्र चांद्रायणतप्तकृच्छ्रयोर्वैकल्पिकत्वम् ॥ चांडालपुल्कसम्लेच्छादीनां चांडालः पुल्कसो म्लेच्छः श्वपाकः पतितस्तथा । एते पंच समाख्याताः पंचपातकिनः समा इति वचनेन पतितसमत्वात्तद्विषयकप्रायश्चित्तग्रहणेपि बृहस्पतिः ॥ पतितानां गृहं गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च । मासोपवासं कुर्वीत चांद्रायणमथापिवेति ॥ चांडालान्नं द्विजो भुक्त्वा सम्यक्चांद्रायणं चरेत् । बुद्धिपूर्वं तु कृच्छ्राब्दं पुनःसंस्कारमेव चेति हेमाद्रिस्थं कूर्मपुराणवचनं बुद्धिपूर्वकान्नभक्षणे कृच्छ्राब्दप्रायश्चित्तविधायकं तत्तु संस्कारकौस्तुभे पुनरुपनयनप्रकरणे मनुवचनत्वेनोपसंगृह्याभ्यासविषयत्वेन व्याख्यातमिति दिक् ॥ "

---

नि. २०, कज्यांतील नि. १८४ मिति वै. शु. १५ शके १८१४ (१ वे. शा. सं. कृष्णशास्त्री राजवाडे. २ नारायणशास्त्री गोडबोले. ३ काशिनाथशास्त्री लेले. ४ गणेशशास्त्री जोशी. ५ काशिनाथशास्त्री अगाशे. ६ बाबाशास्त्री फडके. ७ वासुदेवशास्त्री मैंदर्गीकर. ८ विष्णुशास्त्री. ९ नारायणशास्त्री साठ्ये. १० मोरभट नामजोशी. ११ जनार्दनभट अभ्यंकर या विद्वानांचा अभिप्राय.)

"प्रायश्चित्तीयवचसां बहुत्वात्संशयो भवेत्। तद्व्युच्छित्त्यै करिष्यामो निर्णयं तु यथामति ॥ तत्रादौ धर्मजिघांसया प्रवृत्तानां पुरुषाणां प्रायश्चित्तं नास्ति ॥ तथा च महाभारतेः— जातिश्रेण्यधिवासानां कुलधर्मांश्च सर्वतः । वर्जयंति च ये धर्मं तेषां धर्मो न विद्यत इ- ति ॥ जात्यादिधर्मांश्च ये वर्जयंति तेषां धर्मः प्रायश्चित्तादिस्वरूपो न विद्यत इति नीलकंठः॥ धर्मव्युच्छित्तिमिच्छन्तो येऽधर्मस्य प्रवर्तकाः। हंतव्यास्ते दुरात्मानो देवैर्दैत्या इवोल्बणाः ॥ यो हि पापसमारंभे कार्ये तद्भावभावितः । कुर्वन्नपि तथैव स्यात्कृत्वा च निरपत्रपः ॥ तस्मिंस्तत्कलुषं सर्वं समाप्तमिति शब्दितम् । प्रायश्चित्तं न तस्यास्ति ऱ्हासो वा पाप- कर्मण इति ॥ एवंजातीयवचनानां बहूनां पर्यालोचनेनैवंकर्म कुर्वतां प्रायश्चित्तानर्हत्व- मेव ॥ अथ यदि जात्यादिधर्मव्युच्छित्त्यनु- द्देशेन प्रवृत्ताश्चेदन्यैर्वा प्रवर्तिताश्चेत्तेषां प्राय- श्चित्तं शास्त्रक्लृप्तसंमतमिति धर्मशास्त्रहृदयज्ञैर्ज्ञे- यम् ॥ तदनुसारेणैव प्रायश्चित्तवचनान्युदाह- रिष्यामः ॥ तत्र तावदनेकपुण्यपुंजलब्धं ब्राह्म- णत्वमहंकारादिना यैरवमन्यते तेषां पातित्य- मेव ॥ तथा च भारतेः—ब्राह्मणत्वं शुभं प्राप्य दुर्लभं योवमन्यते । अभोज्यान्नानि चाश्नाति स द्विजत्वात्पतेत वा इति ॥ तत्र श्रीमद्वै- पायनप्रभृतिभिर्ब्रह्मर्षिभिर्हूणानां स्पष्टतरं म्ले- च्छत्वाभिधानात्तत्र तत्र प्रायश्चित्तग्रंथेषु चां- डालप्रातिस्विकरूपेण प्रायश्चित्तमभिधायैवमेव म्लेच्छादीनामपीत्युक्तत्वाद्बुद्धिपूर्वं तदुदकपाने तदन्नभक्षणे च प्रायश्चित्तवचनानि हेमाद्र्यादि- भिराविद्वदंगनाविगोपालं पूज्यमानैर्धर्मशास्त्रा- दिनिपुणैर्यानि संगृहीतानि तानीदानीमुदाहि- यन्ते ॥ तथा च भारतेः—असृजत्पह्लवान्पु- च्छात्प्रस्रवाद्द्रविडाञ्शकान् ।योनिदेशाच्च यव- नाञ्शकृतः शबरान्बहून् ॥ मूत्रतश्चासृजत्कां- श्चिच्छबरांश्चैव पार्श्वतः। पौंड्रान्किरातान्यवसा- न्सिंहलान्बर्बरान्खसान् ॥ चिबुकांश्च पुलिंदांश्च चीनान्हूणान्सकेरलान् । ससर्ज फेनतः सा गौर्म्लेच्छान्बहुविधानपि ॥ तैर्विसृष्टैर्महासैन्यै- र्नानाम्लेच्छगणैस्तदा।नाना(१)वर्णसंछन्नैर्नाना- युधधृतैस्तथा॥ अवाकीर्यत संरब्धैर्विश्वामित्रस्य पश्यतः । एकैकश्च तदा योधः पंचभिः सप्त- भिर्वृत इति ॥

हेमाद्रौ देवलः । अतीव तृषितो विप्रो न शूद्रस्योदकं पिबेत् । तद्भांडे भोजनं चैव ह्य- ज्ञानाद्यदि मार्गतः । तस्योपनयनं भूयस्तप्त- कृच्छ्रेण शुध्यतीति ॥ तत्रैव शंखः । प्रपा- यां शूद्रभांडे च स्थितं तोयं द्विजो यदि । अन्नं वाऽज्ञानतो भुक्त्वा पुनःसंस्कारमाच- रेत् । पश्चाद्देहविशुद्ध्यर्थं तप्तकृच्छ्रं समाचरे- दिति ॥ तत्रैव पराशरः । शूद्रभांडोदकं पीत्वा प्रपामुदकसेवनात् । शूद्रभांडस्थमन्नं च भुक्त्वाऽशुद्धः सदा द्विजः । तस्योपनयनं भूयस्तप्तकृच्छ्रेण शुध्यत इति ॥ एतद्धेमाद्र्या- दिधृतवचनजातपर्यालोचनया शूद्रोदकादिसेव- नेपि पुनःसंस्कारपूर्वकं तप्तकृच्छ्रेण शुद्धि- रुक्ता । तस्मान्म्लेच्छाद्युदकादिसेवने पुनः- संस्कारपूर्वकं प्रायश्चित्तमस्तीति किमु वक्त- व्यमिति सहृदया एव विदांकुर्वन्तु ॥

मयूखे कामतः सकृन्म्लेच्छादिभांडोदक- पाने आपस्तंबः । मदांधम्लेच्छभांडेभ्यो य- स्त्वपः पिबति द्विजः । कृच्छ्रपादेन शुध्येत पुनःसंस्कारमर्हतीति ॥ शेखरेपि नागोजी- भट्टाः । चांडालादिभांडसंस्पृष्टांबुपाने गोमूत्र- यावकं त्रिरात्रं पुनःसंस्कारश्चेति ॥

अथ चांडालाद्यन्नभक्षणे प्रायश्चित्तम् ॥ तत्र च मिताक्षरायां यमः । चांडालपुल्कसा- दीनां भुक्त्वा गत्वा च योषितम् ।कृच्छ्राब्द- माचरेज्ज्ञानादज्ञानादैंदवद्वयमिति ॥ हेमाद्रौ व्यासः । चांडालान्नं द्विजो भुक्त्वा सम्यक्चां-

द्रायणं चरेत् । बुद्धिपूर्वं तु कृच्छ्राब्दं पुनः-
संस्कारमेव चेति ॥ वसिष्ठः चांडालपतिता-
न्नभोजने पुनरुपनयनमिति ॥ धर्मसिंधौ । चां-
डालान्नभक्षणे चांद्रायणं बुद्धिपूर्वं भक्षणे कृ-
च्छ्राब्दमुभयत्र पुनःसंस्कार इति ॥ शेखरेपि
नागोजीभट्टाः । चांडालादिपक्वान्नाशने सर्वत्र
पुनरुपनयनं यवनम्लेच्छयावनानामन्नभोजने-
प्येवम् । अत्र प्रायश्चित्तेन पापनाशेपि व-
चनान्न व्यवहार्यतेति ॥ अथ पूर्वोदाहृतव-
चनेषु सकृदेव चांडालाद्युदकादिसेवने प्राय-
श्चित्तं स्पष्टतरमभिधीयते । अथात्यल्पेषु
कतिपयवचनेषु क्वचित्प्रायश्चित्ताल्पत्वं दृश्य-
ते तत्र स्मृत्यंतरविरोधे पराशरस्मृतेरेव सर्व-
ज्ञैर्माधवादिभिर्ग्रंथकारैर्बलीयस्त्वांगीकारात्तदनु-
रोधेनैव गुणोपसंहारन्यायेन च पुनःसं-
स्कारादि विद्वद्भिर्यथायथमूहनीयम् ॥ एवं
च सर्वेषां वचनानामेकवाक्यतया पुनःसंस्का-
रादिन्यूनप्रायश्चित्तशंकापि नेति सहृदया
एव विदांकुर्वंतु ॥ तथा च माधवः । सर्वथा-
पि त्वया प्रोक्तां निर्मूलां बुद्धिकल्पिताम् ।
कामाकामादिभेदेन नांगीकुर्मो व्यवस्थितिम् ॥
वचनेष्वेव कामादिव्यवस्था लभ्यते यदि ।
सुखेनाभ्युपगच्छामो वाक्यैकशरणा वयम् ॥
कपिलो यदि सर्वज्ञः कणादो नेति का प्रमा ।
इति न्यायः प्रसज्येत बुद्धिमात्रव्यवस्थितौ ॥
मीमांसकत्वमेतत्स्याद्वाक्यानुसरणेन यत् । व्य-
वस्थापनमन्यत्तु पांडित्यख्यापनं परम् ॥ इयं
विशुद्धिरुदिता प्रमाप्याकामतो द्विजम् । इत्य-
कामकृते पापे नाशो निःशेष उच्यते ॥ स्मृ-
त्यंतरेण तच्छुद्धेः सामान्येनाभिधानतः ॥ वि-
शेषादर्शनं यावत्तावत्सामान्यदर्शनम् । मा-
न्यमेवान्यथा ते स्यात्सर्वज्ञत्वेधिकारिता । गु-
णोपसंहृतिश्चैवं यथादर्शनमिष्यतामिति ॥

अथ वपनविचारः ॥ पैठीनसिः । द्वादशाहे
संपूर्णे वपनमिति ॥ वसिष्ठः । कृच्छ्राणां व्रत-
रूपाणां श्मश्रुकेशानि वापयेत् । अक्षिरोमशि-
खावर्जमिति ॥ मदनपारिजाते । सर्वत्र कृ-
च्छ्राणां व्रतरूपाणामित्यादिवपनविधायकवा-
क्येषु निरुपपदकृच्छ्रशब्दोपादानात्तस्य च प्रा-
जापत्यपरत्वात् यत्र च द्विरात्रत्रिरात्रादिसा-
ध्यकृच्छ्राणामावृत्त्या द्वादशरात्रसमता तत्रापि
वपनमस्त्येवेति ॥ अत्र सर्वत्र धर्मशास्त्रग्रंथे-
षु प्राजापत्यादिप्रायश्चित्तानां प्रत्याम्नायस्यो-
क्तत्वेपि क्षौरविषये तथानुक्तत्वात्केशवपनं
कर्तव्यमेव न तद्विषयकः प्रत्याम्नायः ॥
केशसंरक्षणार्थाय द्विगुणं व्रतमाचरेदिति वच-
नं तु राजादिविषयमेवेति भगवद्भिः परा-
शरशंखापस्तंबहारीतप्रभृतिभिरुक्तत्वान्माधवा-
दिभिरपि तथैव व्याख्यातत्वाच्च ॥ प्रायश्चि-
त्तांगवपनविषये प्रत्याम्नायमसहमान आप-
स्तंबोपि यत्किंचित्क्रियते पापं सर्वं केशेषु ति-
ष्ठति । तस्मात्सर्वप्रयत्नेन सशिखं कारये-
द्द्विजमिति वचनेन द्विजविषये प्रत्याम्नायं
प्रत्याचष्टे ॥ किंच द्वित्रादिदिनव्यवधानेन ये
केशश्मश्रूणि वापयंति तेषां प्रायश्चित्तांग-
वपने एव केशसंरक्षणेच्छा जायत इति
प्रायश्चित्तं कुर्वतां तदुपदेष्टॄणां च महाभाग्यमु-
ज्जृंभते ॥

अथ प्रकृतोपयोगि किंचिल्लिख्यते ॥ प्रा-
यश्चित्तेंदुशेखरे । स चेदं पापं न पुनः करि-
ष्यामीति प्रतिजानीयात् । नो चेत्पुनः प्राय-
श्चित्ते योज्यः । आसंवत्सरं प्रायश्चित्ताक-
रणे पापद्वैगुण्यमिति ॥ हेमाद्रौ यस्य यस्य
पापस्य यद्यत्प्रायश्चित्तं प्रतिपदोक्तं तत्तदेव
कर्तव्यमिति ॥

प्रकृतविषये चांडालवेश्मनि पानादिकरणं
चांडालव्यवहृतपात्रपाचितकषायोदकादिसे-
वनं चांडालादिहस्तपाचितकषायोदकादि-
सेवनं चांडालव्यवहृतमृद्भांडेन तदीयकषाया-
दिसेवनं चांडालाद्युच्छिष्टकषायादिसेवन-

मित्येवमादयो बहवो दोषा अनुसंधेयाः ॥ तत्र समुच्चयः प्रसंगसिद्धिर्वेति शास्त्रमर्यादया योज्यम् ॥

अथ प्रायश्चित्तीयपुरुषाणां यथाविधिप्रायश्चित्तकरणसामर्थ्येपि ये प्रत्याम्नायं कथयंति तेषां **नरकपातो** भवति ॥ स्वस्थस्य मूढाः कुर्वंति **वदंत्यनियमं** तु ये । ते तस्य विघ्नकर्तारः **पतंति नरकेऽशुचा**विति । स्नेहाद्वा यदि वा लोभाद्भयादज्ञानतोपि वा । कुर्वंत्यनुग्रहं ये वै **तत्पापं तेषु गच्छती**ति च पराशरस्मरणात् ॥

बहुव्यक्तव्यश्चायमर्थस्तथाप्यलभ्यबहुलावकाशत्वाद्विस्तरभयाच्छ्रीमदाचार्याणां धर्मसंरक्षणैकतानत्वाल्लोभभयाद्यनुपहतमनस्कतया शास्त्रानपन्हुतिद्वारेणैव यथोक्तं प्रायश्चित्तं वक्ष्यंतीति सुतरामाशास्महे इत्यलं पल्लवितेन ॥

यः शंकरः सकलवेदरहस्यवक्ता
बुद्धादिबुद्धितमसां खलु चंडभानुः ।
अभ्युद्धार विगलच्छ्रुतिमार्गमद्धा
भूमंडले विजयते यतिसार्वभौमः ॥

शुभं भवतु ॥

---

शास्त्रार्थाचीं पत्रें छापलीं आहेत. तीं नि० ४ तें २० यांस वर दाखल आहेत.(जो खालीं मजकूर फक्त शास्त्रार्थाचा लिहिला आहे तो विद्वानांनीं सांगितले वरून लिहिला आहे. ) यांपैकीं नि० ४ कारभारी यांनीं घेतलेलें आहे. ५ तें ११ हे ७ अभिप्राय वादीपक्षानें आणविले आहेत व १२ तें २० हे वे. शा. सं. बिंदुमाधवशास्त्री अधिकारी यांनीं आणविले आहेत. यांपैकीं ९।१२ तें २० पावेतो १० अभिप्राय अधिकारी यांचा ठराव होण्यापूर्वी आलेले असून ते कज्यांत दाखल आहेत. त्यावरून आपणा सर्वांस कळून येईल कीं, ते सर्व अभिप्राय ७२ विद्वानांचे आहेत. यांपैकीं नि० ९ यांतील १४ विद्वानांचे मतें प्रतिवादी हे प्रायश्चित्तार्ह नाहींत, १२ विद्वानांचे मतें ( ह्मणजे नि० ९ पैकीं भीमाचार्य व नि० २० यांतील ११ ) जातीचा संकर करण्याचे हेतूनें प्रतिवादी गेले असल्यास प्रायश्चित्तार्ह नाहींत. परंतु त्रिवर्ग न्यायाधीश यांनीं ते जातीचा संकर करण्याचे हेतूनें गेले नाहींत असें ठरविलें असल्यामुळें यावरील विद्वानांचे अभिप्रायाप्रमाणें ते प्रायश्चित्तार्ह आहेत. तेव्हां या अभिप्रायाप्रमाणें प्रतिवादी हे प्रायश्चित्तार्ह असल्याचें बहुमतानें ठरतें. आतां त्यांनीं दिलेल्या अभिप्रायावरून अधिकारी यांनीं ठरावांत बलाबलाधिकरणन्याय करून ठराव सांगितला असल्यामुळें विद्वान मंडळींनीं दिलेल्या अभिप्रायांचा बलाबलाधिकरणन्याय करितांना अधिकारी यांनीं कसा उपयोग केला आहे तें कळून येईल.

७२ विद्वानांच्या अभिप्रायांपैकीं नि० ९ यांतील १९ विद्वानांनीं कांहींच प्रायश्चित्त सांगितलें नसल्यामुळें व नि० १९ यांतील अभिप्राय ज्यांनीं दिला तो प्रश्नास सोडून असल्यामुळें ते वजा केले ह्मणजे बाकी ५६ अभिप्राय शिलक राहतात. या ५६ अभिप्रायांपैकीं ३७ विद्वानांचे अभिप्राय–चहा पिण्याचे दोषाबद्दलचीं प्रायश्चित्तें प्रत्यक्ष क्षौरपूर्वक केलीं पाहिजेत असे स्पष्ट आहेत व बाकीचे १९ विद्वानांनीं प्रायश्चित्तास क्षौर हें अवश्यच असल्यामुळें त्यासंबंधानें कशाच रीतीचा उल्लेख केला नाहीं. या अभिप्रायांत बेचाळीस विद्वानांनीं प्राजापत्यापेक्षां मोठें सांतपन, एकानीं तीन चांद्रायणें, अकरांनीं तप्तकृच्छ्र, एकानीं द्वादशाब्द आणि एकांनीं पादकृच्छ्र अशीं प्रायश्चित्तें सांगितलीं

असल्या कारणानें ५५ ही विद्वानांच्या मतें प्रत्यक्ष क्षौरपूर्वकच प्रायश्चित्तें झालीं पाहिजेत. कारण, हीं सर्व प्रायश्चित्तें प्राजापत्य-कृच्छ्रापेक्षां मोठीं आहेत आणि प्राजापत्यालाही क्षौर अवश्य आहे असें नि० १३।१४।१८व२० ह्मणजे ३७ विद्वानांचे अभिप्रायांवरून होत आहे.

बिस्किटाबद्दल सदर ५६ विद्वानांनीं अभिप्राय दिलें आहेत त्यांत (नि० १२) एकांच्या मतें चार चांद्रायणें व तप्तकृच्छ्र, (नि० १३) दहांच्या मतें अब्दकृच्छ्र व तप्तकृच्छ्र, ( नि० १४ ) पंधरांच्या मतें चांद्रायण नुसतें अगर तप्तकृच्छ्रसहित, ( नि० १६ ) एकांच्या मतें कायकृच्छ्रसहित चांद्रायण, ( नि० १७ व १९ ) सतरांच्या मतें चांद्रायण, ( नि० १८)एकांच्या मतें द्वादशाब्द आणि (नि.२०) अकरांच्या मतें अब्दकृच्छ्र अशा रीतीचीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. यांत एकंदरीनें पाहतां ३४ विद्वानांचे अभिप्रायांत चांद्रायण प्रायश्चित्त असून बाकी २२ विद्वानांचीं प्रायश्चित्तें चांद्रायणाहूनही मोठीं आहेत. ज्या ग्रंथांचा अधिकारी यांनीं ठरावांत उल्लेख केला आहे त्या मयूखादि ग्रंथांत चांद्रायण प्रायश्चित्ताचा विधि सांगितला त्यांत प्राजापत्यापासूनचे प्रायश्चित्ताला सामान्य न्यायानें क्षौर प्राप्त असूनही आणखी वाचानिक क्षौर सांगितलें आहे व त्यांत जर विकल्प करणें असेल तर केश ( डोक्याचे ) वपन न करितां श्मश्रु ( मुखावरलि केश ) वपन केलेंच पाहिजे.

यावरून अधिकारी यांनीं आपले ठरावांत "**एक सांतपन व एक चांद्रायण प्रायश्चित्त यथाशास्त्र** घ्यावें " असें जें ठरविलें आहे त्याचा " बलाबलाधिकरण-न्यायानें " अधिकाऱ्यांच्या मताप्रमाणें जरी विचार केला तरी सांतपन व चांद्रायण हीं प्रायश्चित्तें प्रत्यक्ष क्षौराखेरीज होत नाहींत. शिवाय ५६ विद्वानांच्या अभिप्रायांपैकीं ३७ विद्वानांचे अभिप्रायांत फक्त चहापानास सुद्धां पुनःसंस्कार सप्रमाण सांगितला असून त्याप्रमाणें एक सुद्धां प्रायश्चित्त सांगितलें नाहीं. या कारणानें त्यांनीं जीं प्रायश्चित्तें सांगितलीं तीं त्यांनीं आणिलेल्या अभिप्रायांतीलच बहुमतानें चुकीचीं आहेत असें स्पष्ट होतें. बाकींचीं दोन प्रायश्चित्तें ब्रह्मकूर्च व सर्वप्रायश्चित्त हीं न्यायाधीशांचे बहुमताप्रमाणें रद्द झाल्यामुळें त्यांजबद्दल विचार करण्याचें कारण नाहीं.

या कामीं वादीपक्षानीं व कारभारी यांनीं आणविलेले अभिप्रायही वरच्या ह्मणण्यास बळकटी देत आहेत, ( पहा नि० ४।६ते ११ ) श्री० बापूसाहेब यांनीं आपले अभिप्रायांत संसर्गसंबंधानें जो मजकूर लिहिला त्याचा खुलासा आश्विन व० १ चे पत्रानें केलेला नि० ३ यांतील टिपेंत दिला आहे. त्यास कारभारी यांचे अभिप्रायावरून, त्याचप्रमाणें त्यांनीं जे शास्त्र्यांचे अभिप्राय घेतलेले नि० ४ यांस दाखल आहेत त्यावरून व **श्रृंगेरी मठ सर्वाधिकारी** यांनीं दोष येतो असें स्पष्ट म्हटलें आहे त्यावरून बळकटी येते.

---

श्रीमंत राजश्री बाळासाहेब कुरुंदवाडकर यांच्याही अभिप्रायाची नक्कल मिळावी अशाबद्दल त्यांच्याकडेही **विनंति, पत्रद्वारें व समक्ष** केली होती. परंतु लेखी कांहींच उत्तर त्याजकडून मिळालें नाहीं. समक्ष विनंति केल्यावेळीं " मीं त्याची नक्कल ठेविली नाहीं यामुळें ती देतां येत नाहीं. श्रीकडे त्याजबद्दल मागणें करावें. मीं नक्कल

ठेविली असती तर आनंदानें दिली असती ” असें त्यांनीं सांगितलें. गेल्या भाद्रपदमासीं खिद्रापूर मुक्कामीं श्रीकडे गेलों असतां तेथें श्रीसमक्ष त्यांचे कोल्हापूर येथील वकिलांनीं जे त्रिवर्ग न्यायाधीशांचे अभिप्राय आह्मांस दाखविले त्यावेळीं श्री० बाळासाहेब यांचा अभिप्राय श्रीमंत बापुसाहेब व रावसाहेब भडकमकर यांच्या अभिप्रायांहून भिन्न असल्यामुळें मुख्य मुद्यांचा जो त्यांतला भाग तात्पर्यरूपानें उतरून घेतला तो या खालीं ( निशाण २१ ) दाखल करितों.

---

( नि० २१ ) श्रीमंत **बाळासाहेब कुरुंदवाडकर** यांनीं दिलेला अभिप्राय.

“हल्लींच्या ग्रामण्याचे कामीं पुण्यांतील **महाविद्वान व थोर मनाच्या मनुष्यांनीं धर्माचे विरुद्ध कृत्य करणें हें त्यांस फार कमीपणा आणणारें** आहे. आतां झालेलीं प्रायश्चित्तें जर योग्य रीतीनें झालीं असतील अशी जर **श्रीची खात्री** असेल तर पुन्हां नवीन देण्याचें कारण दिसत नाहीं. कारण, कालमानाकडे लक्ष्य दिलेंच पाहिजे. ज्यावेळीं आपले धर्मग्रंथ झाले त्यावेळची स्थिति व हल्लींची स्थिति पाहिली तर त्यांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे. व ज्या कालांत जें उचित होईल तेंच अनुमानानें करावें असें आमचें मत आहे. उदाहरणार्थ पूर्वीच्या कालीं बालविवाह होत नव्हते नवऱ्याचे अगोदर बहुतकरून त्यांच्या स्त्रिया मरत, असा ईश्वरी निश्चय असे, तो प्रकार हल्लीं नाहीं. आतां पहावें तर शेंकडा पन्नासपाऊणशें बालविधवा दृष्टीस पडतात. आतां माझें मत पुनर्विवाहा करावा असें नाहीं; परंतु, कालस्थिति पाहिली ह्मणजे त्या कालाप्रमाणें कांहीं तरी सोय केली पाहिजे. आतां या ग्रामण्याचे कामीं श्रींचे अधिकारी यांनीं जो योग्य विचार करून चहाचेसंबंधानें प्रायश्चित्त दंड केला **तो योग्य रीतीनें जाहल्यास** पुन्हां करविण्याचें कारण नाहीं असें मला वाटतें.

ज्ञाताज्ञात पापाबद्दल रा० रा० माधवराव रानडे. रा० रा० भट वगैरे मंडळींस जें प्रायश्चित्त अधिकारी यांनीं दिलें तें फिरूं नये असें माझें मत आहे. कारण शास्त्रिद्वय यांस पूर्ण अधिकार दिले होते व त्यांनीं जें योग्य रीतीनें केलेलें आहे त्यांत फरक करूं नये असें मला वाटतें. **तें फिरवावें असें श्रींचे नजरेस आल्यास श्रींनीं फिरवावें.**

आतां बिस्किटांसंबंधानें थोडें लिहिण्याचें आहे. पुराव्यांत असें दिसून आलें आहे कीं बिस्किटें तेथें आणलीं होतीं व तेथें ठेवलीं होतीं. परंतु, कोणीं खाल्लीं याबद्दल भरपूर पुरावा आलेला नाहीं. या संबंधानें लेले यांची जबानी विश्वसनीय मानावी तर तो बाटलेला असून त्यास जितके लोक आपल्या वर्गांत येतील तितकें इष्टच आहे. ह्मणून त्यांच्यावर आमचा बिलकूल विश्वास नाहीं हाच प्रकार युरोपियनविषयीं आहे.

सांसर्गी लोकांस श्रींकडून बार अंक ५७ चें शुद्धिपत्र मिळालें आहे व त्यांनीं अधिकारी यांचे ठरावास अनुसरून ज्यांनीं प्रायश्चित्तें घेतलीं त्यांच्याशीं व्यवहार अन्नोदकाचा केला तो दोषास पात्र नाहीं व याच करतां सांसर्गी लोकांस कांहींच दोष नाहीं असें आमचें मत आहे.

आरोपी मनुष्यास संशयाचा फायदा दिला पाहिजे येवढ्या कारणाकरतां बिस्कि-

टासंबंधानें संशय आहे ह्मणून तो फायदा आह्मी **आरोपींस ह्मणजे कृष्णपक्षांतील मंडळीस** देतों. एकंदरीवरून आम्ही आपलें मत असें देतों कीं चहाशाबितीसंबंधानें श्रीचे अधिकारी यांनीं जीं प्रायश्चित्तें दोषी मंडळीस दिलीं आहेत तीं रास्त आहेत व **योग्य रीतीनें झालीं असल्यास** पुन्हां तीं फिरवावीं असें आमचें मत नाहीं जर तीं प्रायःश्चित्तें **यथाशास्त्र झालीं नसल्यास** त्यांजकडून तीं **श्रीनीं करवावीत.** बिस्किटें खाल्याची शाबिती नाहीं असें आह्मांस वाटतें.

सांसर्गी लोकांस दोष देण्यास कांहीं कारण नाहीं ते शुद्धिपत्राप्रमाणें शुद्ध आहेत.

ता० १४ माहे मे सन १८९३ इसवी.

( सही इंग्रजी. )

**चिंतामणराव रघुनाथ.**

---

हा अभिप्राय अवलोकन केला ह्मणजे त्यांनीं सुद्धां **प्रतिवादींनीं धर्मविरुद्ध केलेलें कृत्य त्यांस फार कमीपणा आणणारें** आहे असें लिहून "झालेलीं प्रायश्चित्तें जर योग्यरीतीनें झालीं असतील अशी जर श्रीची खात्री असेल तर पुनः नवीन देण्याचें कारण दिसत नाहीं" असें लिहिलें आहे.

बार अंक ९९ शके १८१४ चे पत्रांत श्रीनीं **"ठराव व प्रायश्चित्ताबद्दल वगैरे संशय आहे"** असें नमूद केलें असल्याकारणानें श्री. बाळासाहेबांनाही श्रीप्रमाणेंच **प्रायश्चित्ताबद्दलचा संशय आल्याचें सिद्ध होत आहे.** त्याचप्रमाणें ज्ञाताज्ञात दोषांबद्दल कांहीं प्रतिवादींस दिलेलें प्रायश्चित्त **"फिरवावें असें श्रीचें नजरेस आल्यास श्रीनीं फिरवावें"** असें नमूद केलें असल्यामुळें श्री. बाळासाहेब यांचा या कामीं **स्वतंत्र अभिप्रायच नाहीं** व श्रीनीं ज बार अंक ९९चे आज्ञापत्रांत संशय नमूद केला आहे तर श्री० बाळासाहेब यांसही तसा **संशय असून त्यांनीं** सुद्धां आपल्या अभिप्रायाचे अखेरीस **"प्रायश्चित्तें यथाशास्त्र झालीं नसल्यास त्यांजकडून तीं श्रीनीं करवावींत"** असें स्पष्ट लिहिलें असल्यामुळें तो अभिप्राय सर्वस्वी वादीपक्षाचे अनुकूलच आहे अशी सर्वांची खात्री होईल.

बार अंक ९९ मध्यें श्रीनीं ठराव व प्रायश्चित्तें वगैरेबद्दल संशय असल्याचें स्पष्ट लिहिलें आहे आणि ९७ नंबरचे आज्ञापत्रांत तर शुद्धिपत्रांत नमूद असलेल्या प्रतिवादि वगैरे १९ इसमांशीं **"तुह्मीं धर्मसंबंधीं वहिवाट बंद ठेवावी"** अशी सर्व ब्रह्मवृंदास आज्ञा देऊन ९९ मधील संशयाची निवृत्ति करून **दोषाविषयीं स्वतःची खातरी झाल्याचें श्रीनीं दर्शविलें आहे.** सबब संसर्गी लोकांस दोष नाहीं असा जो आपला अभिप्राय श्रीमंत बाळासाहेब यांनीं दिला आहे **तसा अभिप्राय मूळ प्रायश्चित्तांबद्दल त्यांना संशयच असल्यामुळें देतां येत नाहीं** हें उघड आहे.

"आरोपी मनुष्यास संशयाचा फायदा दिला पाहिजे येवढ्या कारणाकरितां बिस्किटासंबंधानें संशय आहे ह्मणून तो फायदा आह्मी **आरोपीस ह्मणजे कृष्णपक्षांतील मंडळीस देतों**" या त्यांच्या लिहिण्याचा आरोपी व कृष्णपक्षी वेगळे असल्यानें नीटसा बोध होत नाहीं.

हल्लींचा विषय **धर्मशास्त्राचा असल्यामुळें संशयाचा फायदा आरोपीस देणें हें अगदीं धर्मशास्त्राविरुद्ध आहे.** असें

श्रीमंत बापूसाहेबांच्या अभिप्रायावरून होत आहे आणि श्री० बाळासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणेंच धर्मशास्त्र असतें तर **अपवाद प्रायश्चित्तप्रकरण धर्मशास्त्रांत नमूद केलें नसतें** व अधिकारी यांनीं जीं आपल्या ठरावांत **अपवाद प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत तीं सांगितलीं नसतीं.**

कारभारीसाहेब यांस कित्येक वेळां बार अंक ५९ प्रमाणें निकाल मिळावा अशी विनंति केली असतां त्यांजकडून ठराव न मिळाल्यामुळें भाद्रपद वद्य ६ शके १८१९ रोजीं श्रीस विनंति केल्यावरून श्रीकडून बार अंक ६८ मिति मजकुरचें आज्ञापत्र देण्यांत आलें कीं "**आजच निकाल होण्यास सवड नाहीं. संस्थान देवतेची स्वारी संकेश्वरीं गेल्यावर लागलींच १५ दिवसांत यथाशास्त्र** निकाल सांगण्यांत येईल." त्याप्रमाणें आजपावेतों ठराव, बार अंक ५९ प्रमाणें कारभारीसाहेब यांजकडून आला नाहीं. श्रीमंत बापूसाहेबांनीं अभिप्रायांत शास्त्रार्थाबद्दल **शास्त्रीमंडळाकडून विचार होणें आहे** असें म्हटलें असल्यामुळें व ६८ नंबरच्या आज्ञापत्रांत श्रीनींही "**यथाशास्त्र** निकाल सांगण्यांत येईल" असें लिहिलें असल्यामुळें "**शास्त्ररीत्या विचार करण्याकरितां शास्त्री मंडळी घेऊन कधीं यावें**" अशा अर्थाचें विनंतिपत्र श्रीकडे पाठविलेलें खालीं ( निशाण २२ ) दाखल केलें आहे.

नि० २२, श्रीजगद्गुरु यांस वादीपैकीं बळवंत रामचंद्र नातु यांजकडून भाद्रपद वद्य ३० शके १८१९ मित्तीचें विनंतिपत्र पाठविण्यांत आलें तें.

"श्रीकडून बार अंक ६८ ची आज्ञा **यथाशास्त्र** निकाल देण्याबद्दल खिद्रापूर मुक्कामीं समक्ष देण्यांत आलीच आहे व त्या कामीं अधिकारी यांनीं जे अभिप्राय शास्त्रीमंडळीचे आणविलेले कज्जांत दाखल आहेत व कुरुंदवाड मुक्कामीं रा० रा० रा० सा० माधवराव मोरेश्वर भडकमकर, पंच व संस्थानचे कारभारी यांनीं चौकशीचें कामीं प्रायश्चित्ती व तत्संसर्गी यांजबद्दल तेथें जमलेले शास्त्रीमंडळीकडून घेतलेले अभिप्राय व इतर ठिकाणचे शास्त्री व पंडित यांजकडून कांहीं अभिप्राय आणविले आहेत त्याजवरून निकाल करण्यांत येईल ह्मणून सदरील आज्ञापत्रांत नमूद आहेच त्या कामीं आणखी शास्त्रीमंडळी बोलावून निर्णय **यथाशास्त्र** होणें अवश्य असल्यामुळें श्रीकडून सूचना येतांच शास्त्रीमंडळी येण्यास तयार आहेत असें ह्या विनंतिपत्रानें कळवीत आहों तरी हल्लीं सुचविलें प्रमाणें व अव्वलपासूनही सुचवीत होतोंच त्याप्रमाणें इकडून शास्त्रीमंडळी घेऊन कधीं यावें त्याजबद्दल उलट टपालावर आज्ञापत्र यावें अशी विनंति आहे. ह्याप्रमाणें व्यवस्था झाली आणि **शास्त्रोक्त** निकाल झाला ह्मणजे पुनः वाद शिलक राहणार नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना."

---

ह्याप्रमाणें अद्याप पावेतों कांहीं तजवीज झालेली समजण्यांत आली नाहीं.

आणखी असेंही कळवितों कीं, प्रायश्चित्ती व **संसर्गी याजबद्दल लौकर निकाल व्हावा** अशी श्रीस श्रीमंत रावसाहेब **पंतप्रतिनिधी** संस्थान औंद यांजकडून विनंति करण्यांत आल्यावर श्रीकडून त्यास बार अंक ८०, ६।११।९३ चें आज्ञापत्र आल्यावरून त्यांणीं जें श्रीचे पत्रास उत्तर पाठवि-

लें तेंही ब्रह्मवृंदांनीं अवलोकन करण्याजोगें असल्यामुळें तें निशाण २३ यास दाखल केलें आहे व त्या पत्राप्रमाणें श्रीकडून श्री. पंतसाहेब यांस सुद्धां खुलासा अद्याप गेला नाहीं तेंही कळवितों !

नि. २३:—"बेचाळीस खेरीज दोन्ही पक्षाबद्दल नंबर ९७।४९ चीं आज्ञापत्रें गेलीं असून आजपावेतों तक्रार कां राहिली याचें कारण समजत नाहीं. त्यावरून कळविण्यांत येतें कीं, कृष्णपक्षाचे लोक कोणते तरी प्रमाणें **सांसर्गीक दोष झाल्याचें कबूल करीत असून त्यांस अल्प स्वल्प कांहीं तरी प्रायश्चित्त सांगितले** शिवाय स्वामींनीं दोषमुक्त ठरविलें हें ब्रह्मवृंदापैकीं **बहुसमाजास पसंत न वाटल्यामुळें आपलीं पत्रें आजपावेतों अमलांत आलीं नाहींत.** व संसर्गी यांस दोष नाहीं असेविषयीं स्वामीकडून **आधार लिहून** आल्याशिवाय वरील नंबर ९७।४९ चीं पत्रें **अमलांत येतील असें वाटत नाहीं.** कदाचित् कालांतरानें सांसर्गाचा विसर पडेल, परंतु **स्वामीच्या पत्रांनीं निकालास लागणें अवश्य असून तसें होणार नाहीं हें मात्र खेदकारक आहे.** तर संसर्गाबद्दल **प्रायश्चित्त नको** असा **आधार लिहून आल्यास** अगर कांहीं तरी स्वल्प प्रायश्चित्त कृष्णपक्षांतील ह्मणविणारांस सांगून निकाल व्हावा हें उचित आहे. **स्वामीची गादी कायम असतां बखेडा माजावा हें बहुतेकांस प्रशस्त वाटत नाहीं.**"

---

वरील मजकूर लिहून झाल्यावर कारभारीसाहेब यांजकडे ९९ नंबर प्रमाणें लवकर ठराव प्रसिद्ध करण्याबद्दल ज्या वारंवार विनंत्या करण्यांत आल्या त्यांबद्दल त्यांनीं कळविलें कीं, "**मजकडे जो ठराव प्रसिद्ध करण्याकरितां आला तो बार अंक ९९ चे आज्ञापत्राशीं विरुद्ध असल्यामुळें त्या कामीं मीं जो रिपोर्ट श्रीकडे केला आहे त्याचा जबाब आल्याखेरीज मी सदरील ठराव प्रसिद्ध करीत नाहीं.**" तेव्हां ठराव प्रसिद्ध करणें नसल्यास आपण केलेला रिपोर्ट दाखविण्याची हरकत नसल्यास तो दाखवा अशी विनंति केल्यावरून त्यांनीं श्रीकडे केलेल्या रिपोर्टाची नकल मला दाखविली ती खालीं ( निशाण २४ ) दाखल केली आहे.

नि. २४;—"रा. रा. स्वारी कामगार यांजकडे माधवराव मोरेश्वर भडकमकर कारभारी निसबत श्री यांजकडून—

श्री जगद्गुरु शंकराचार्य यांजकडून बार अंक ८३ मि० कार्तिक शु० ४ शके १८१९ चे आज्ञापत्राबरोबर पुण्यांतील चहा बिस्किट ग्रामण्याचा ठराव बार अंक ८१ मि० कार्तिक शु० १ शके १८१९ चा पक्षकारांस कळविण्याकरितां इकडे आला, त्या कामीं जे दोष कळून आले ते या पत्रानें कळवित आहें.

१ श्रीकडे अपिल चालविण्यास सुबोध पत्रिका नांवाचे पत्रांतील ४२ सांपैकीं एक या सहीनें पत्र छापिलें त्यामुळें हरकत आहे असें श्रींस आश्विन शुद्ध २ शके १८१४ चें नातूंचें पत्र श्रीकडे गेल्यावरून श्रींनीं बार अंक नंबर ९९ मि० आश्विन शुद्ध ९ शके १८१४ चें आज्ञापत्र दिलें त्यांत लिहिलें आहे कीं, "आश्विन शुद्ध २ चें विनंति पत्र लिहिल्याप्रमाणें विचार करण्यास **तिऱ्हाईत न्यायाधीश संस्थानाकडून नेमून व संस्थानचे कारभारी मार्फत तु-**

म्हांस यथान्याय निकाल मिळेल "त्या-विरुद्ध हल्लींचा ठराव आहे.

२ चौकशीकरितां श्रीकडून त्रिवर्गास नेमण्यांत आलें. तिघांचे अभिप्रायही श्रीकडे गेले आहेत, त्यांत जें बहुमत होईल, त्याप्रमाणें ठराव कारभारी यांनीं लिहून त्याप्रमाणें निकाल देणें एवढेंच कर्तव्य वरील आज्ञापत्राप्रमाणें करण्याचें राहिलें आहे. हल्लींचा ठराव नंबर ८१ चा त्या विरुद्ध आहे या कारणानें तो प्रसिद्ध करण्यांत मजवर, श्रीवर व संस्थानावर अंक ९९चे आज्ञेप्रमाणें दोष येत असल्यामुळें असें काम करून संस्थानावर श्रीवर व मी आपल्यावर दोष घेण्यास तयार नाहीं व असे रीतीनें दोष मठावर आणविणें माझ्यानें होणार नाहीं.

३ काम चालविलें तें फिर्यादीनें द्वेषबुद्धीनें चालविलें असें अधिकारी यांनीं आपले ठरावांत म्हटलें त्याविरुद्ध न्यायाधीश यांनीं आपला अभिप्राय दिला कीं, फिर्यादींनीं या कामांत मदतच केली आहे ती गोष्ट ठरावांत नमूद होणें अवश्य आहे,

४ जात मोडण्याकरितां जरी चहा वगैरे पदार्थ सेवन केले नाहींत, असें न्यायाधीश यांनीं आपले अभिप्रायांत लिहिलें तत्रापि बुद्धिपुरःसर चहापान केलें आहे असें स्पष्टपणें आहे. ती गोष्ट मुद्द्याची असल्यामुळें व बहुमताप्रमाणें असल्या कारणानें ठरावांत नमूद झाली पाहिजे.

५ प्रायश्चित्त घेण्यास पश्चात्तापाची शास्त्ररीत्या अत्यावश्यकता आहे व हेंच मुख्य तत्त्व शास्त्रांत असून त्याविरुद्ध ठरावांत लेख येणें ह्मणजे श्रीकडून शास्त्रविरुद्ध अधिकाराचें अतिक्रमण होत आहे हें गैर होत आहे.

६ न्यायाधीशांनीं बहुमताप्रमाणें बिस्किटें सेवन केल्याचा अपवाद शाबीत धरला असतां त्या मुद्द्यापुरती अधिकारी याचे ठरावांत दुरुस्ती जहाली पाहिजे.

७ ज्या मंडळींनीं चहा घेतला नाहीं त्यांजवर चहाचा अपवाद येतो असें अधिकारी यांनीं जें ठरविलें आहे त्याजबद्दल न्यायाधीश यांनीं बहुमताप्रमाणें चहा घेतला असें ठरविलें आहे. सबब ती दुरुस्ती अधिकारी यांचे ठरावाबद्दल असली पाहिजे व वरील कलमांतील व या कलमांतील अपराध ज्याजवर शाबीत झाला असें बहुमताप्रमाणें ठरविलें आहे त्यास त्या दोषाप्रमाणें नवीं प्रायश्चित्तें सांगितलीं पाहिजेत.

८ महादेव गोविंद रानडे वगैरे जे अरोपी पूर्वीच दुसऱ्या दोषाबद्दल बहिष्कृत आहेत, त्यांनीं व या अपराधांपैकीं कांहींनीं सर्व प्रायःश्चित्त घेतलें तें त्या त्या दोषास जें उक्त प्रायश्चित्त तें घेतलें पाहिजे. त्या मुद्द्यावरील ठराव न्यायाधीश याचे बहुमताप्रमाणें अधिकारी यांचा ठराव दुरुस्त करून त्यांचें प्रायश्चित्त ( सर्व प्रायश्चित्त ) रद्द केलें पाहिजे.

९ टिळक व भट यांपैकीं भटांनीं कांहींच तजवीज अधिकारी याचे ठरावाप्रमाणें केली नाहीं व त्या दोषांचीं प्रायश्चित्तेंच या दोषाबद्दलचीं नसल्यामुळें त्याबद्दल फिर्यादीची तकरार असतां ज्या अर्थी हल्लींचे ठरावांत कांहींच उल्लेख करण्यांत आला नाहीं, त्याअर्थी न्यायाधीश यांनीं जो याबद्दल निकाल दिला आहे तोच श्रीस संमत आहे असें उल्लेख केला नसल्यामुळें सिद्ध होत आहे त्याजबद्दल उल्लेख करून अधिकारी यांचा ठराव न्यायाधीशाचे

बहुमताप्रमाणें दुरुस्त केला पाहिजे व टिळक यांचें प्रायश्चित्त रद्द केलें पाहिजे.

१० फिर्यादी यानीं ज्या तेरा तकरारी अपिलाच्या केल्या त्यांपैकीं जेवढ्यांचा खुलासा दोन्ही पक्षांकडून कुरुंदवाड मुक्कामीं घेण्यांत आला त्यांतच सर्व तकरारींचा उल्लेख दोघां पक्षकारांकडून करण्यांत आल्यामुळें बाकीच्या मुद्यांची द्विरुक्ति न व्हावी ह्मणून ज्यास्त खुलासा केला नाहीं. श्रीनीं हल्लींचे ठरावांत जें **अनुमान** त्याजबद्दल काढिलें आहे तें **बरोबर नाहीं** व फिर्यादींनीं एकंदरीनें ही सर्व तकरारी कळविल्या आहेतच यामुळें **श्रीचें** काढिलेलें **अनुमान चुकीचें आहे.**

११ प्रायश्चित्ताबद्दल आरोपी यानीं यथाशास्त्र केल्याबद्दल शाबीत करावें अशी आज्ञा हल्लींचे ठरावांत जाहली आहे ही **मोठी चूक आहे.** कारण **प्रायश्चित्तें** बराबर **झालीं नाहींत वगैरे** बहु मताप्रमाणें **स्पष्ट** होत आहे यामुळें असा चुकीचा ठराव होण्यानें **श्रीकडे दोष** येत आहे. व त्यामुळें चौकशी होऊन ९७।४९ नंबरचीं पत्रें **रद्द होणें** अवश्य असतां तीं कायम ठेवणें ह्मणजे या क्रियेनें वर कळविलेल्या चुकांची दुरुस्ती न झाली तर **सुबोधपत्रिकेंतील लेखाची सत्यता जगास कळून येऊन** त्यामुळें **श्रीचा अपमान सर्व जगांतील शिष्यांकडून होणार आहे.**

१२ वरील कलमावरून संसर्गास प्रायश्चित्त पाहिजे अशाबद्दल श्री० बापुसाहेब यांनीं दुसरें पत्र पाठवून श्रीस कळविलें असतां व ज्या पत्राची प्रसिद्धि संकेश्वरी आल्यावर मजला लागली असून **त्या विरुद्ध हल्लींचे ठरावांत श्री० बापुसाहेब कुरुंदवाडकर यांचे अभिप्रायाबद्दल उल्लेख करून संसर्गास** प्रायश्चित्त नको हें **लिहिणें** हल्लींचे ठरावांत **फारच भयंकर आहे.** शिवाय दोषी ( ४२ व संसर्गी ) यांजबद्दल शास्त्ररीत्या विचार करण्याचें अद्याप श्री० बापुसाहेब यांनीं **शास्त्रीमंडळाकडून होण्याची विनंति केली असतां** असे रीतीचा **ठराव संस्थानांतून होणें फार भयंकर आहे.**

१३ वर लिहिलेल्या सर्व दुरुस्त्या बहुमताप्रमाणें ठरावांत होऊन तो ठराव व त्यासोबत **त्रिवर्ग न्यायाधीशांचे अभिप्राय** श्री बापूसाहेब यांनीं जो संसर्गाबद्दल मजकूर अश्विनमासांत कळविला आहे **त्या सर्वांबद्दल प्रसिद्धि व्हावी** ह्मणजे **सर्वांस मान्य** होऊन संस्थानास एक प्रकारचें **भूषण येणार** आहे नाहीं पेक्षां ९७।४९ नंबरच्या पत्रांची जी स्थिति जाहली तीच या **ठरावाची होईल.**

सदरील लिहिलेल्या हरकती अति योग्य आहेत असें श्रीस विचार केला असतां कळून येईल. **याच कारणामुळें** श्रीकडून आलेला **ठराव प्रसिद्ध न करितां आपल्यास कळविलें आहे.** इतक्या उपर जाहलेला ठराव ( नंबर ८१ चा ) प्रसिद्ध करण्याची आज्ञा होईल तर ज्या क्रियेनें **मजवर, श्रीवर व संस्थानावर जगाचा दोष व शास्त्रविरुद्ध वर्तन** होणार तें मी आपलेवर घेण्यापेक्षां चाकरीचा **राजीनामा द्यावा** कीं कसें तें अति नम्रपणानें कळवितों.

येणेंप्रमाणें तकरारी वाजवी असाव्या असें वाटतें तें विदित करून आज्ञा होईल ती कळवावी. तारीख १६ नवंबर १८९३.

**माधवराव मोरेश्वर भडकमकर.**

वार अंक ९९ प्रमाणें वास्तविक श्रींनीं स्वतः ठराव करावयाचा नसून फक्त तिऱ्हाईत न्यायाधीशांचे अभिप्राय प्रसिद्ध करावयाचे असतां तसे जर श्री न करतील तर श्रींस व त्यांनीं केले ठरावास किती दोष येईल हें या पत्रावरून स्पष्ट कळून येईल. शिवाय या पत्रावरून कारभारी यांचा अभिप्राय कसे रीतीचा आहे याचें दिग्दर्शनही होत आहे.

श्री० बापुसाहेब यांनीं आपले ठरावांत कज्जांतील नि० १३ चा उल्लेख केला असल्यामुळें व त्याचप्रमाणें रा० ब० रानडे प्रभृति ८ प्रतिवादि यांनीं सर्व प्रायश्चित्ताबद्दल केलेला जो अर्ज कज्जांतील नि० १७३ यास आहे त्यांत काय मजकूर लिहिला आहे तें समजण्याची इच्छा कोणाची राहूं नये ह्मणून दोन्ही कागद खालीं नि० २५ व २६ यांस दाखल केले आहेत.

नि० २५, कज्यांतील नि० १३ श्रीजगद्गुरु श्रीशंकराचार्य यांस विनंतीपत्र प्रतिवादींपैकीं १ बाळगंगाधर टिळक केसरी पत्रकर्ते, २ वासुदेव गणेश जोशी चित्रशाळा छापखान्याचे म्यानेजर व ३ सदाशिव गणेश पराजपे यांणीं पाठविलें तें.

“ सच्छिष्यांतर्गत खालीं सह्या करणार यांची साष्टांग प्रणिपातपूर्वक विज्ञप्ति ऐसीजे श्रीकडून श्रावण शुद्ध ११ शके १८१३ चें आज्ञापत्र आलें होतें त्यास शिष्याकडून लवकर जाब जाण्याचा परंतु येथें कांहीं प्रकार घडत होते ते संपेपर्यंत आह्मास उत्तरीं खरें वर्तमान श्रीस निवेदन करितां येत नव्हतें आतां ते सर्व प्रकार आटोपल्यामुळें असें करण्यास हरकत दिसत नाहीं ह्मणून श्रीस विज्ञापना करीत आहों त्याची माफी असावी. श्रीकडून चहा घेण्या संबंधीं विचारणें झालें आहे त्यांस असा चहा ख्रिस्ती लोकांकडे होणार आहे असें ठाउक असोन जे लोक गेले होते त्यांची नांवें पुणें वैभवांत प्रसिद्ध झालीं आहेत व त्यांपैकीं बहुतेक मंडळींनीं चहा घेतला होता तर सभेस गेल्या मंडळींपैकीं आपण चहा घेतला नाहीं असें ह्मणून एकानें पुणें वैभवावर आपली बेअब्रु केली ह्मणून फिर्याद केली होती त्या फिर्यादीचा नुक्ताच निकाल होऊन ही हकीकत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्याचा हक्क नाहीं या मुद्यावर पुणेंवैभव कर्त्यास रुपये २०० दंड झाला. हा दंड योग्य झाला आहे कीं नाहीं हें अपिलाचा निकाल होईपर्यंत सांगतां येत नाहीं. तथापि येवढ्यानें पुणेंवैभवांतील मजकूर खोटा ठरला असें होत नाहीं व श्रीकडे कोणीं असें सांगितल्यास तें विश्वसनीय मानण्यांत येऊं नये. खेरीज वर्तमानपत्रकारांचा व श्रींचा अधिकार भिन्न असून श्रीस या प्रकरणीं चौकशी करून निकाल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. ही गोष्ट कोर्टांत सिद्ध झाली असून श्रीच्या शिष्यवृंदांसही शिरसामान्य आहे. सदर प्रसंगीं गेलेल्या कांहीं लोकांकडून श्रीकडे **चुकवाचुकवीचें व धरसोडीचें उत्तर** गेलें असल्याचें समजतें व हल्लीं श्रीकडे ह्मणून कांहीं **खटपटी** गृहस्थ त्या लोकांच्या तर्फे पाठविण्यांत आले आहेत अशी बातमी आहे त्यास श्रीस आमची सविनय येवढीच प्रार्थना आहे कीं या धरसोडीच्या लेखास किंवा सदर गृहस्थांचे बोलण्यास श्रींनीं विशेष मान न देतां असल्या आचरणाबद्दल **कायमचा शास्त्रार्थ** करवून निकाल लावावा व खालीं सही करणार शिष्यांची कोणत्याही प्रकारें चुकवाचुकवी अगर छपवाछपवी कर-

ण्याचा इरादा नाहीं करितां श्रींना सविनय-विज्ञप्ति करीत आहों.

१ श्रींचे आज्ञापत्रांत लिहून आल्याप्रमाणें पांचहौद मिशन शाळेंत प्रकार घडून आलेला खालील सही करणार यांस प्रत्यक्ष माहीत आहे. व तेथें **पुष्कळ लोकांनीं चहा घेतला.** त्या ठिकाणीं कोणकोण गेले होते त्यांची दुरुस्त केलेली कच्ची याद सोबत पाठविली आहे त्याप्रमाणें आपण चहा घेतला किंवा नाहीं असें श्रींनीं प्रत्येकास विचारून त्याचा शपथेवर ज्याप्रमाणें जबाब येईल त्याप्रमाणें पुढें व्यवस्था करावी.

२ प्रसंगविशेषीं ब्राह्मणांस शूद्रादिकांचे हातचें फक्त पाणी ( अन्न नव्हे ) घेण्यास कांहीं हरकत आहे कीं काय याचा देशकालानुरूप व शास्त्रानुरूप श्रींनीं कायमचा निर्णय ठरवावा. दोष असल्यास किती व त्यास प्रायश्चित्त काय हेंही कायमचें ठरविण्यांत यावें म्हणजे असल्या भानगडी पुन्हां उपस्थित होणार नाहींत.

३ वरील गोष्टींचा निकाल करण्याकरितां कोणास तेथें येण्यास श्रींकडून आज्ञा झाल्यास आम्ही येऊं अगर आमच्या तर्फे कोणास तरी पाठवून देऊं कळावें. श्रींच्या सेवेशीं श्रुत होय, हे विज्ञापना. आश्विन वद्य १४ शके १८१३."

मिशन हौसमध्यें जे लोक गेले होते त्यांची यादी. १ रा. ब. महादेव गोविंद रानडे २ वा. बा. केळकर. ३ गो. वा. कानिटकर. ४ वि. मो. भिडे. ५ वि. ना. आपटे. ६ स. ग. परांजपे. ७ रा. वा. मोडक. ८ प्र. गो. नरवणे. ९ ह. वि. आठवले. १० ना. स. पानसे. ११ माधवराव जोशी. १२ गो. ल. काजवेकर. १३ ज. वि. कुळकर्णी. १४ वि. गो. सासवडकर. १५ गं. वि. जोशी. १६ वि. अं. पटवर्धन. १७ बा. गं. टिळक. १८ प. ना. पाटणकर. १९ वि. ना. भट. २० खं. चि. बेदरकर. २१ वा. प्र. पराजपे. २२ वा. बा. रानडे. २३ स. रा. फडके. २४ वि. त्रिं. चिपळूणकर. २५ कृ. ब. डोंगरे. २६ रा. मो. साने. २७ शि. ग. देवधर. २८ बा. रा. सोमण. २९ क. वा. धामण. ३० शि. ना. अंकलेकर. ३१ अं. ग. वांगेकर. ३२ वि. नानूभाई. ३३ गो. ब. देवल. ३४ र. ना. पंडित. ३५ के. पां. गोडबोले. ३६ वा. ग. जोशी. ३७ व्हि. के. राजवाडे. ३८ गो. कृ. गोखले. ३९ शं. ग. जोशी.

---

निशाण २६ कज्यांतील निशाण १७३

वे. शा. सं. बिंदुमाधवशास्त्री व व्यंकटशास्त्री निपाणकर यांस १ शिताराम गणेश देवधर, २ प्रभाकर गोविंद नरवणे. ३ वामनराव बाळकृष्ण रानडे. ४ चिंतामण नारायण भट.* ५ महादेव* गोविंद रानडे. ६ गोविंद वासुदेव कानीटकर. ७ विष्णु* मोरेश्वर भिडे. ८ वामनराव प्रभाकर* परांजपे, यांनीं वैशाख शु० १४ शके १८१४ चा अर्ज, ज्ञाताज्ञात दोषाबद्दल चहा बिस्कीट ग्रामण्याचे चौकशींत दिला तोः—

" हल्लीं ग्रामण्याचें काम आपल्या पुढें चालू आहे परंतु ज्या गृहस्थांनीं हा वाद उपस्थित केला आहे त्यांपैकीं कांहीं गृह-

---

* हे गृहस्थ पुनर्विवाहाचे अध्वर्यु असून यांपैकीं ४।५।७ हे प्रार्थना समाजिस्ट आहेत. सदर समाजाचा नियम " भेद न राखतां परस्परांशीं बंधु भावानें वागावें म्हणजे जातिभेद मानावयाचा नाहीं. " असा आहे. ( ज्ञानदीप पु० ४ अं० ५ पृ० ९९, १०२ ).

स्थांचे हेतुविषयीं शंका घेण्यास बरींच कारणें आहेत. व तीं कारणें सयुक्तिक आहेत अशाविषयीं आपलीही बहुतेक खात्री झालीच असेल या सर्व गोष्टी मनांत आणून ग्रामण्यांतील मुख्य आग्रही लोकांशीं प्रसंग करून जास्त वाद वाढवावा ही गोष्ट आम्हांस अगदीं संमत नसल्यामुळें चौकशीचे कामीं आम्हीं समक्ष अगर मुखत्यार मार्फत हजर राहण्याची तजवीज ठेविली नाहीं तथापि **सनातन चालत आलेल्या धर्माचे संरक्षणाविषयीं जितकी वादीपक्षाची इच्छा आहे तितकीच आम्हा सर्वत्रांचीही आहे.** मात्र निष्कारण बखेडा करून आपसांत दुही माजवावी ही गोष्ट हल्लींच्या स्थितींत फारच अपायकारक आहे. आतां **गैरसमजुतीनें अगर दुसरे कित्येक कारणानें न्याय होऊन वैदिक धर्मास संमत नाहीं असें कांहीं वर्तन झालें असल्यास त्याजबद्दल शास्त्रांत सांगितलेलें अनुशासन कबूल करण्यास कोणाही ब्राह्मणास संकोच वाटण्याचें कारण नाहीं व त्याचप्रमाणें आमच्या हातून आजपर्यंत तसे कांहीं प्रकार झाले असतील अगर झाले अशी कोणाची समजूत होईल तर त्याजबद्दल श्रींची जी योग्य आज्ञा होईल ती आम्हां शिष्यवर्गास मान्य होईल.** आमची इच्छा इतकीच आहे कीं ज्याअर्थीं आतां आपल्याकडे अर्ज झाले आहेत त्याअर्थीं अशा कामीं गांवांतील बखेडा होतां होईल तितका मोडण्याचा बंदोबस्त व्हावा व त्या बंदोबस्ताप्रमाणें सर्वांनीं वागावें हें श्रेयस्कर आहे. हें जाणून आपल्यास ह्या विनंति लेखानें कळविलें आहे. मि० वैशाख व० १४ शके १८१४."

बार अंक ९९ चे आज्ञापत्राप्रमाणें ठराव लवकर बाहेर पडेल अशी आशा दिसत नसल्यामुळें या प्रकरणाचा निकाल ब्रह्मवृंदांना लावण्यास सोईचे पडावें ह्मणून व कदाचित् बार अंक ९९ प्रमाणें कारभारी मार्फत न्यायाधीशांचा ठराव लवकरच आल्यास तोही यथाशास्त्र आहे किंवा नाहीं ह्याचा निर्णय करण्यास साधन व्हावें ह्मणून हें पत्र पुस्तकरूपानें ब्रह्मवृंदास सादर केलें आहे. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंति.

मिति पौष शुद्ध १ शके १८१९

**बळवंत रामचंद्र नातु.**

---

# जाहिरात.

## आर्यधर्मदर्पण.

ह्या नांवाचें रायल अष्टपत्री सांच्याच्या ४८ पृष्ठांचें मासिक पुस्तक येत्या माघ मासापासून सुरू होईल. महाराष्ट्र भाषांतरासह **महाभारत, योगवासिष्ठ व महा कवींचे ग्रंथ** आणि यथेष्ट वर्तन साधार करतां यावें ह्मणून सुधारणाप्रिय लोकांकडून जीं आलीकडे पुस्तकें तयार होऊं लागलीं आहेत त्यांतील विषयांचा **धर्मशास्त्रदृष्ट्यायोग्य विचार** असे चार विषय सवडीनुसार यांत येतील. पहिल्या अंकांत **विवाहकालनिर्णय** हा निबंध असून त्यांत श्रुति, स्मृति, सूत्रें, पुराणें, इतिहास व ज्योतिःशास्त्र इत्यादिकांचा संपूर्णपणें विचार केला आहे. शिवाय महाभारत २४ पृष्ठें असून योगवासिष्ठ ८ पृष्ठें आहे. प्रत्येक विषयाचे पृष्ठांक सोईकरितां वेगळे घातलेले आहेत. पुस्तकांतील विषय महत्त्वाचे असून सार्वकालिक उपयोगीं पडणार असल्यामुळें कागद पहिल्या प्रतीचे घातले आहेत. अगाऊ वर्गणीदार होणारास केव्हांही होतां येण्याकरितां त्यानें वर्गणी भरलेल्या तारखेपासून [illegible] मुदत धरण्यांत येईल. वाईंतील वर्गणीदारांनीं आपली वर्गणी रा० रा० केशव बळवंत वैद्य आर्यधर्मदर्पण व्यवस्थापक मोदवृत्त छापखाना वाई यांजकडे भरावी आणि पुस्तकांसंबंधानें पत्रव्यवहार वगैरे ज्यास कर्तव्य असेल त्यांनींही त्यांजकडेच करावा. बाहेर गांवच्या वर्गणीदारांनीं आपली वर्गणी श्री० रा० बळवंत रामचंद्र नातु शनवार पेठ पुणें यांजकडे भरावी.

| | रु० | आ० | ट० हा० रु० | आ० |
|---|---|---|---|---|
| अगाऊ वर्गणी | | | | |
| वर्षाची | ४ | ० | ० | ८६ |
| सहामाही | २ | ८४ | ० | ८३ |
| तिमाही | १ | ८४ | ० | ८१८६ |
| फुटकळ अंक | ० | ८८ | ० | ८८६ |

अशा प्रकारचें मासिक पुस्तक इतक्या [illegible] किंमतींत हें [illegible]लेंच होय. मिति पौष शु [illegible] १ शके १८१९.

काशिनाथ वामन लेले वाईकर.